## छत्रपती संभाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह माहिती; चौघांवर गुन्हा



**मुंबई** : छत्रपती संभाजी महाराजांबद्दलचा विकिपीडियावर असेलला आक्षेपार्ह मजकूर न हटविल्याबद्दल आता महाराष्ट्र सायबर पोलिसांनी चार एडिटर्सविरोधात गुन्हा दाखल केला आहे. विकिपीडियाची कॅलिफोर्नियास्थित असलेल्या नोडल एजन्सी विकिमीडिया फाउंडेशनला नोटीस पाठवून आक्षेपार्ह मजकूर हटविण्यास सांगितले गेले आहे. विकिमीडिया ही स्वयंसेवी संस्था असून त्यांच्याद्वारे विकिपीडियाचे संचलन केले जाते. महाराष्ट्र सायबर सेलने पाठविलेल्या ई-मेलला विकिमीडियाकडून कोणतेही उत्तर न आल्यामुळे महाराष्ट्र सायबर सेलने आयटी कायद्याच्या विविध कलमाद्वारे विकिपीडियाच्या चार एडिटर्स विरोधात गुन्हा दाखल केला. बॉलीवूड अभिनेता केआरके म्हणजेच कमाल आर खान याने काही दिवसांपूर्वी विकिपीडियावरील माहिती वापरून वादग्रस्त पोस्ट केली होती.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २१७
www.ramprahar.com

शनिवार, २२ फेब्रुवारी २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


### अंतरंग


महाडमध्ये केमिकल टँकरला अपघात; नागरिकांना त्रास/२

उच्चदाब विद्युत वाहिनीविरोधात शेतकरी झाले आक्रमक/५

केरळ, विदर्भ संघ रणजी ट्रॉफिच्या फायनलमध्ये/८


# मराठीने मानवी विचारांना व्यापक बनवले

## पंतप्रधान मोदींचे गौरवोद्गार, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन

**छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरी**
**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मराठी भाषेचा जन्म संस्कृतमधून झाला, पण मराठीवर प्राकृत भाषेचाही तेवढाच प्रभाव आहे. पिढी दर पिढी मराठी भाषेने कूस बदलत ती पुढे जात राहिली आणि या भाषेने मानवी विचारांना आणखी व्यापक बनविले, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठी भाषेची महती सांगितली. नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन पंतप्रधान मोदींच्या हस्ते शुक्रवारी (दि. २१) झाले. त्या वेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर, स्वागताध्यक्ष शरद पवार, प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मावळते अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष प्रा. उषा तांबे आदी मान्यवर उपस्थित होते.




राजधानीत आलेल्या सर्व सारस्वतांना माझा नमस्कार, असे म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणाची सुरुवात मराठीत केली. (पान २ वर..)

> *भाषा हे संस्कृतीचे बलस्थान असते. भाषा ही जोडणारी गोष्ट असायला हवी, तोडणारी नाही. मराठी फक्त लिखीतच नाही, तर ती बोलीतून पसरली आहे. आज एक स्त्री अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची अध्यक्ष झाली हे महत्त्वाचे नाही, तर गुणवत्ता हा विषय महत्त्वाचा आहे.*
> **-डॉ. तारा भवाळकर, अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन**

### स्वागताध्यक्ष शरद पवारांकडून पंतप्रधान मोदी यांचे कौतुक

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यात बोलताना संमेलनाध्यक्ष खासदार शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक केले. मराठी संमेलन देशाच्या राजधानीत दुसऱ्यांना होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहिले याचा आनंद आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देण्यासाठी त्यांनी जी भूमिका घेतली ती महत्त्वाची आहे. मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन तत्कालीन पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी केले होते. त्यानंतर आता दिल्लीत ७० वर्षांनंतर या संमेलनाची पुनरावृत्ती होत आहे. पंतप्रधान मोदी यांना आमंत्रण दिल्यानंतर त्यांनी लगेच होकार दिला. ते आज संमेलनासाठी आहेत. त्यासाठी मी त्यांचे आभार मानतो, असे या वेळी खासदार पवार यांनी म्हटले.

# रायगडातील १५,५६० बेघरांना मिळणार आज हक्काचे घर!

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात महाआवास अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २मध्ये जिल्ह्यातील १५ हजार ५६० लाभार्थ्यांना मंजुरीपत्र देण्यात आले असून ११ हजार ७९१ लाभार्थ्यांना लाभाचा पहिला हप्ता मंजूर करण्यात आला आहे. यापैकी आठ हजार १०३ लाभार्थ्यांना लाभाचे वितरण शनिवारी (दि.२२) होणार आहे.

घरकुल लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचा वितरण करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या प्रमुख उपस्थितीत पुण्यातील बालेवाडी येथे राज्यस्तरीय कार्यक्रमाचे आयोजन २२ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार, ग्रामविकास व पंचायतराजमंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत राज्यातील २० लाख लाभार्थ्यांना मंजुरी पत्र व १० लाख लाभार्थ्यांना प्रथम हप्ता वितरण करण्यात येणार आहे. राज्यातील सर्व जिल्हे, तालुके व ग्रामपंचायती येथेही एकाच वेळी हा कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे.

१ जानेवारी ते १० एप्रिल या शंभर दिवसांच्या कालावधीत सर्वांसाठी घरे या शासनाच्या धोरणांतर्गत बेघरांना घरे देण्यासाठी घरकुलांना मंजुरी देण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण २०२४२-२५मध्ये १५ हजार ५६० लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करण्यात आलेली असून त्यांची मंजुरी पत्रे देण्यात आली आहेत तसेच ११ हजार ७९१ लाभार्थ्यांना पहिला हप्ता मंजूर करण्यात आलेला असून त्यापैकी आठ हजार १०३ लाभार्थ्यांच्या पहिल्या १५ हजार रुपयांच्या हप्त्याचे वितरण शनिवारी जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावरील कार्यक्रमात करण्यात येणार आहे, तर उर्वरित लाभार्थ्यांना पुढील काही दिवसात लाभाच्या पहिल्या हप्त्याचे वितरण करण्यात येईल अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे यांनी दिली.

### प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ दृष्टिक्षेपात

| तालुका | घरकुल मंजुरी | प्रथम हप्ता मंजूर |
|---|---|---|
| अलिबाग | १४४ | ११६ |
| कर्जत | १८४१ | १४६० |
| खालापूर | ६७४ | ५०५ |
| महाड | २८१० | २१५८ |
| माणगाव | १४२७ | १०९९ |
| म्हसळा | १४१० | १०३६ |
| मुरुड | ५६५ | ३५५ |
| पनवेल | २३७ | १७१ |
| पेण | १६४२ | ११८० |
| पोलादपूर | १०२४ | ८६७ |
| रोहा | १३७९ | ९११ |
| श्रीवर्धन | ५९९ | ५०९ |
| सुधागड | १२३१ | ९७० |
| तळा | ५०२ | ३९३ |
| उरण | ७५ | ६१ |
| एकूण | १५५६० | ११७९१ |

# अलिबाग, रसायनीत ऑनलाईन चक्रीजुगार अड्ड्यांवर धाड

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील अलिबाग आणि रसायनी येथे स्थानिक गुन्हे शाखेने टाकलेल्या धाडीत चक्री पद्धतीने खेळले जाणारे दोन ऑनलाईन जुगार अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले. या प्रकरणी सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून संगणक व रोख रक्कम असा ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अलिबाग, पेण, रसायनी, रोहा, नागोठणे इत्यादी ठिकाणी अवैधरित्या ऑनलाईन चक्री पद्धतीने जुगार खेळत असल्याबाबत व यातून गरीबांची फसवणूक होत असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे आल्या होत्या. त्यावरून पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांना कारवाई करण्याचे आदेश दिले. खाडे यांनी तीन अधिकारी व १५ अंमलदार यांची चार वेगवेगळी पथके तयार करून रोहा, नागोठणे, रसायनी, अलिबाग व पेणमध्ये रवाना केली.

### सहा जणांविरोधात गुन्हा दाखल, मुद्देमालही जप्त

अलिबागच्या कोहिनूर कॉम्प्लेक्समधील दुकानात ऑनलाईन पद्धतीने जुगार सुरू असल्याची माहिती पोलिसांकडे होती. तेथे छापा टाकण्यात आला. या प्रकरणी कल्पेश सर्वे, राजेश निशाद व शिल्पेश पोवळे यांच्याविरोधात महाराष्ट्र जुगार ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत दोन संगणक व रोख रक्कम असा एकूण ३८ हजार ५२० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

रसायनी मोहोपाडा येथेही ऑनलाईन पद्धतीने जुगार अड्ड्यावर धाड टाकून कारवाई करण्यात आली. यात तीन संगणक व रोख रक्कम असा ४५ हजार ७०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी सतीश शेजुळ, श्रीकांत पांगत, शिल्पेश पोवळे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# उरण पं. स.ची २८ फेब्रुवारीला आमसभा

**उरण : प्रतिनिधी**

उरण पंचायत समितीची आमसभा २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता जेएनपीए वसाहत येथील बहुउद्देशीय सभागृहात आमदार महेश बालदी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे.

या आमसभेसाठी उरण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांनी शासकीय व निमशासकीय तसेच विविध प्रकारच्या ६२ आस्थापनांच्या अधिकाऱ्यांना व संबंधितांना निमंत्रित केले आहे. आमसभेत विविध विषयांवर चर्चा होणार आहे.

## निवडक

### न्यू इंडिया बँक घोटाळा; आरोपींना पोलीस कोठडी

**मुंबई** : न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँक घोटाळाप्रकरणी अटक केलेल्या तिन्ही आरोपींना शुक्रवारी (दि. २१) सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणात बँकेचे माजी सीईओ अभिमन्यू यांना गुरुवारी आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली होती. त्यांच्यासह मुख्य आरोपी हितेश मेहता, धर्मेश पान यांची २८ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

### महाराष्ट्र सायबर सेलचे राखी सावंतलाही समन्स

**मुंबई** : कॉमेडियन समय रैनाचा इंडियाज गॉट लेटेंट शो वादात अडकला. रणवीर अलाहाबादियाने आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने वाद पेटला आहे. आता महाराष्ट्र सायबर सेलने 'ड्रामा क्वीन' राखी सावंतलाही समन्स पाठवले आहे. तिने एका एपिसोडमध्ये हजेरी लावली होती. तिचा एपिसोडही वादात अडकला आहे. त्यामुळे महाराष्ट्र सायबर सेलने राखीला २७ फेब्रुवारी रोजी हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

# दहावीची परीक्षा सुरू; रायगडात ७५ केंद्र आणि ३७ हजार ३६८ विद्यार्थी

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या दहावीच्या परीक्षेला शुक्रवार



(दि. २१)पासून सुरुवात झाली. रायगड जिल्ह्यात ७५ केंद्र आहेत. मराठी, इंग्रजी, सेमी इंग्लिश विविध माध्यमातील एकूण ३७ हजार ३६८ विद्यार्थी यंदा दहावीची परीक्षा देणार आहेत. परीक्षार्थींमध्ये विद्यार्थिनींपेक्षा विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे.

पनवेल तालुक्यात १९ केंद्रांवर १३ हजार ४८६ विद्यार्थी, उरण पाच केंद्रांवर दोन हजार ५१५ विद्यार्थी, खालापूर पाच केंद्रांवर तीन हजार १३८ विद्यार्थी, कर्जत नऊ केंद्रांवर तीन हजार १११ विद्यार्थी, सुधागड दोन केंद्रांवर ७९८ विद्यार्थी, पेण पाच केंद्रांवर दोन हजार १०२ विद्यार्थी, अलिबाग पाच केंद्रांवर दोन हजार ७७३ विद्यार्थी, मुरूड दोन केंद्रांवर ९४३ विद्यार्थी, रोहा पाच केंद्रांवर दोन हजार १६ विद्यार्थी, माणगाव आठ केंद्रांवर दोन हजार ४८ विद्यार्थी, तळा एक केंद्रावर २४४ विद्यार्थी, म्हसळा एक केंद्रावर ५४८ विद्यार्थी, श्रीवर्धन दोन केंद्रांवर ९६२ विद्यार्थी, महाड चार केंद्रांवर दोन हजार २३१ विद्यार्थी आणि पोलादपूर तालुक्यात दोन केंद्रांवर ४५३ विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत.

कॉपीचे प्रकार रोखण्यासाठी कडक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. परीक्षा केंद्रांवर सर्व विद्यार्थ्यांची कसून तपासणी करण्यात येत आहे. प्रत्येक केंद्रात व्हिडीओ चित्रीकरण केले जात आहे. परीक्षा केंद्रावर देखरेख ठेवण्यासाठी चार भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली आहेत.

### जालना, यवतमाळमध्ये पेपरफुटी?

**जालना, यवतमाळ : प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील बदनापूर येथील एका परीक्षा केंद्रावर दहावीच्या परीक्षेचा पहिलाच पेपर फुटल्याचा दावा करण्यात येत आहे. जालन्यात घडलेल्या या प्रकारानंतर यवतमाळमध्येही असाच प्रकार घडल्याची माहिती समोर आली आहे, मात्र शिक्षण मंडळाने याचा इन्कार केला आहे.

बदनापूरमध्ये पेपर सुरू झाल्यानंतर अवघ्या पंधरा मिनिटांतच प्रश्नपत्रिका बाहेर आली. त्यानंतर उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रत काढून विद्यार्थ्यांना पुरवल्या गेल्याचे सांगण्यात येत आहे. प्रशासनाने मात्र असा कोणताही प्रकार झाला नसल्याचे सांगितले. प्रश्नपत्रिका परीक्षा केंद्राच्या बाहेर आलेली नाही, तथापि या ठिकाणी दगडफेक झाली असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. दरम्यान, या संदर्भात अहवाल मागवण्यात आला आहे. दुसरीकडे यवतमाळमधील महागाव तालुक्यातील कोठारी येथील घटनेचीही अधिकाऱ्यांकडून चौकशी सुरू आहे.

# पीएम किसान सन्मान निधी २४ फेब्रुवारीला होणार जारी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशातील ९.८ कोटी शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा १९वा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या २४ फेब्रुवारी रोजी जारी करणार आहेत. या अंतर्गत सुमारे २२ हजार कोटी रुपये शेतकऱ्यांच्या हस्ते हस्तांतरित केले जातील, अशी माहिती केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी दिली.

केंद्रीय कृषीमंत्री चौहान म्हणाले की. २४ फेब्रुवारी रोजी बिहारमधील भागलपूर येथील एका कार्यक्रमातून पंतप्रधान मोदी पीएम किसानचा १९वा हप्ता जारी केला करतील. ही रक्कम पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा केली जाईल. फेब्रुवारी २०१९मध्ये लाँच करण्यात आलेली पीएम किसान ही जगातील सर्वात मोठी डीबीटी (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर) योजना आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना बियाणे आणि खते खरेदीसाठी लागणारा खर्च भागवण्यास मदत झाली आहे.

पीएम किसान योजनेंतर्गत प्रत्येक लाभार्थी शेतकऱ्याला दर चार महिन्यांनी दोन हजार रुपयांच्या तीन समान हप्त्यांमध्ये सहा हजार रुपयांचा वार्षिक लाभ दिला जातो. सरकारने आतापर्यंत या अंतर्गत एकूण ३.४६ लाख कोटी रुपये वितरित केले आहेत.

# दिल्लीत अभिजात मराठीचा जयघोष!

## तालकटोरा स्टेडियम परिसरात संस्कृतीचे दर्शन






**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त शुक्रवारी (दि. २१) सकाळी भव्य ग्रंथदिंडी काढण्यात आली. पारंपरिक वेशभूषेत सहभागी मराठीजन, लोकनृत्यांचे सादरीकरण व अभिजात मराठीच्या जयघोषाने राजधानीतील तालकटोरा स्टेडियमचा अवघा परिसर मराठीमय झाला होता.

जुन्या संसद परिसरातील रकाबगंज गुरूद्वाराजवळ ग्रंथपूजन, ध्वजारोहण होऊन ग्रंथदिंडीला सुरुवात झाली. या वेळी संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्ष प्रा. उषा तांबे, नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडियाचे अध्यक्ष मिलिंद मराठे, मावळते अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, खासदार सुप्रिया सुळे, सरहद संस्थेचे अध्यक्ष संजय नहार यांच्यासह अनेक ज्येष्ठ साहित्यिक, दिल्लीतील आणि महाराष्ट्रातून आलेले हजारो मराठी बांधव मोठ्या उत्साहाने मराठमोळ्या वेशभूषेत दिंडीत सहभागी झाले. या वेळी पंढरपूर येथून साहित्य संमेलनासाठी आलेली विशेष दिंडीही सोबत होती.

### महाराष्ट्राच्या आकर्षक चित्ररथाने जिंकली मने

*संत ज्ञानेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, गड-किल्ले, ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त साहित्यिकांच्या रचना अशी आकर्षक सजावट चित्ररथावर करण्यात आली होती. दिल्लीकरांनी त्याला भरभरून प्रतिसाद दिला. ९८व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनातर्फे विशेष चित्ररथ तयार करण्यात आला. या चित्ररथाच्या माध्यमातून देशाच्या राजधानीत महाराष्ट्राच्या अभिजात भाषा-संस्कृतीचे दर्शन घडले.*

ढोलताशाच्या गजरासह दिंडीत लावणी, पोतराज, वाघ्या-मुरळी, गोंधळ, पोवाडा, वासुदेव, आदिवासी नृत्य आदी लोककला, लोकनृत्यांचे सादरीकरण झाले. या वेळी महिलांनी उत्स्फूर्तपणे फुगडी खेळली.

# पनवेलमधील आकुर्ली येथे रस्ता काँक्रीटीकरणाचे भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील आकुर्ली गावापासून ते पनवेल-माथेरान महामार्गापर्यंत रस्त्याच्या काँक्रीटीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून एमएमआरडीएच्या फंडामधून ८० लाखांच्या या कामाचे भूमिपूजन भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २१) झाले.

भाजप अनुसूचित जाती सेलचे अमित जाधव, भाजप तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, माजी सरपंच सचिन पाटील, ग्रामपंचायत सदस्य मच्छिंद्र पाटील, हरिश्चंद्र भोपी, पोलीस पाटील किसन पाटील, उपसरपंच नितीन धरणेकर, लक्ष्मण धरणेकर, शंकर पाटील, अभिजित पाटील, भगवान धरणेकर, जनार्दन काकडे, विलास भोपी, ग्रामपंचायत सदस्य देवेंद्र नाईक, दिनकर म्हस्कर, राम कुडावकर, आशिष म्हसकर, सुरेश म्हसकर, सुधाकर धरणेकर, नरेश भोपी, सुदाम पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मालमत्ता कर थकवणाऱ्यांविरोधात कडक पाऊल

## कारखाना, हॉटेल्स, लॉजवर पनवेल महापालिकेकडून धडक कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्यावतीने मालमत्ता कर न भरणाऱ्या नावडे उपप्रभागातील तळोजा एमआयडीसीमधील थकीत मालमत्ता कर असणाऱ्या कारखान्यावरती जप्तीची कारवाई करण्यात येत आहे. याचबरोबर कळंबोलीमधील थकीत मालमत्ता कर असणाऱ्या हॉटेल्स,लॉजवरती महापालिकेने अटकावणी कारवाईस सुरूवात केली आहे.



दरम्यान आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सुचनेप्रमाणे थकबाकीदारांना जप्तीपुर्व नोटीसानंतर सात दिवसांचा कालावधी पुर्ण होऊन, मालमत्ता कर न भरलेल्या, वॉरंट नोटीसा देऊनही मालमत्ता कर न भरणाऱ्या आस्थापनावर अटकावणी व जप्ती कारवाईस सुरूवात करण्यात आली आहे.

आतापर्यंत पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध नोडमध्ये सुमारे ४४७ जप्तीपूर्वीच्या नोटीसा व २७ वॉरंट नोटीसांचे वाटप थकबाकीदार मालमत्ता धारकांना दिल्याने थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत. आयुक्तांच्या सुचनेनूसार जप्ती मोहीम अधिक तीव्र करण्याचा इशारा महापालिकेच्यावतीने देण्यात आला आहे.

आजवर महापालिकेने सातत्याने नागरिकांना मालमत्ता कर भरण्याबाबत आवाहन केले आहे. परंतू आता महापालिकेने थकबाकीदारांच्या विरोधात कठोर पावले उचलण्यास सरुवात केली आहे. उपायुक्त स्वरूप खारगे व कर अधिक्षक महेश गायकवाड तसेच कर अधिक्षक सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली जप्ती कारवाई व वसुली कारवाईसाठी मनुष्यबळ वाढविण्यात येत आहे. वसुली कारवाईला गती देण्यासाठी येत्या दिवसांमध्ये वसुली टिममध्ये वाढ करण्यात येणार आहे.

दरम्यान मालमत्ता कर न भरल्यास त्याच्या शास्तीमध्ये प्रतिमहा २ टक्क्यांची वाढ होत असल्याने तसेच महापालिकेच्यावतीने प्रसिध्दी माध्यमातून केलेल्या आवाहनामुळे नागरिकांच्या मनातील शंकाचे निरसन झाल्याने कर भरण्यास नागरिकांचा चांगला प्रतिसाद दिसून येत आहे. गेल्या काही दिवसापासून मालमत्ता कराच्या भरण्यामध्ये भरघोस वाढ होताना दिसत आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रात तीन लाख ५० हजार निवासी, बिगर निवासी, व्यावसायिक, औद्योगिक आदी नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून कर वसुलीसाठी महापालिकेचे विविध झोन तयार केले आहेत. तसेच ऑनलाईन आणि विविध पच्या माध्यमातून कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांना मालमत्ता कर भरण्यासाठी महापालिकेत न येता ऑनलाईन पध्दतीने भरता यावा यासाठी महापालिकेने 'सिटीझन प्रॉपर्टी टॅक्स पेमेंट गाईड ' तयार केले आहे.

# महाडमध्ये केमिकल टँकरला अपघात; चालक गंभीर जखमी

## केमिकल गळतीमुळे परिसरात भीतीचे वातावरण

**महाड : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर गुरुवारी महाड तालुक्यातील दासगाव हद्दीत सलफ्युरीक ॲसिड घेऊन जाणारा टँकर रस्त्या लगतचे कठडे तोडून पलटी झाल्याने टँकरला गळती लागली. ॲसिड मुळे परिसरातील नागरिकांना त्रास जाणू लागल्याने भितीचे वातवरण पसरले या अपघातात टँकर चालक गंभीर जखमी झाला.

गुरुवारी महाड एमआयडीसी मधील न्यूइंडिया डिटरजंट प्रायव्हेट लिमिटेड या कारखान्यातून सलफ्युरीक ॲसिड भरून नाशिकला जाणार्या टँकर चालकाचा ताबा सुटून दासगाव हद्दीत वस्ती लगतच पलटी झाला. अपघाता नंतर टँकरला गळती सुरू झाली टँकर मधून बाहेर



वाहणारे ॲसिड गटारामधून वाहत थेट वस्ती गेले त्या मुळे परिसरातील नागरिकांना डोळ्यांची जळजळ आणि स्वास घेताना त्रास होउ लागला. सुरवातीला कोणते केमिकल आहे हे माहीत नसल्याने लोकांमध्ये भीती निर्माण झाली.

घटनेची माहिती मिळताच महामार्ग वाहतूक पोलीस उप निरीक्षक प्रवीण धडे,महाड शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक एस वी खाडे हे आपल्या कर्मचाऱ्यांसोबत घटना स्थळी पोहचले त्या नंतर महाड नगरपालिका आणि एमआयडीसी अग्निशामक दल, रुग्णवाहिका तसेच मार्क सेफ्टी ग्रुपचे विकास सासणे,शीतल पाटील,सी डी देशमुख आणि आप्पासाहेब गजबार त्या ठिकाणी दाखल झाले.त्यांनी टँकरला लागलेली गळती थांबवत नागरिकांना या ॲसिड मुळे होणारा त्रास आणि त्यावर उपाय या वर मार्गदर्शन केले.

अपघाता नंतर चालक आणि वाहक याचा शोध सुरू केला असता चालक आत मध्ये अडकलेल्या अवस्थेत दिसून आला स्थानिक नागरिक महमद म्हेस्कर,वलीद टोलकर,मीरहसन अनवारे,साकीब शेखनाग यांनी चालक रामप्रसाद भोजराज गुरजर रा.राजस्थान याला जखमी अवस्थेत बाहेर काढले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्रॅम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शुक्रवारी कॉमर्स व अकाउंटन्सी विभागातर्फे फॅकल्टी एक्स्चेज प्रोग्रॅमचे आयोजन केले होते.

या फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्रामसाठी राजीव गांधी महाविद्यालयातील (वाशी) प्रा.श्वेता शेट्टी यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र विषयातील बारकावे, वेगवेगळ्या संकल्पना या विषयी मार्गदर्शन केले या व्याख्यानाचा लाभ सुमारे ५० विद्यार्थी व विद्यार्थिनीनी घेतला.

प्रा. राहुल कांबळे यांनी राजीव गांधी महाविद्यालयात उपस्थित राहून द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना सर्विस सेक्टर विषयी मार्गदर्शन केले व त्यांच्या शंकांचे निरसन केले त्यांच्या व्याख्यानाचा लाभ सुमारे ६० विद्यार्थी व विद्यार्थिनीनी घेतला.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांच्या मार्गदर्शनात हा शैक्षणिक उपक्रम यशस्वीरित्या घेण्यात आला. या फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्रॅमचे आयोजन प्रा. विशाल देशमुख विभाग प्रमुख कॉमर्स व अकाउंटन्सी प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. तनुजा सुमन, प्रा. प्रमोद वाघे, प्रा. मनोज यादव व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले.

# माजी आमदार सुरेश लाड यांचे आंदोलन मध्यरात्री स्थगित

**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत पोलीस ठाण्यात शेतकऱ्यांच्या जमिनीची मोजणी झाल्याशिवाय कल्पतरू कंपनीने कुंपणाच्या भिंतीचे बांधकाम करू नये, या मागणीसाठी भाजप नेते व माजी आमदार सुरेश लाड यांनी पोलिस स्थानकाच्या पायरीवरच झोपून सुरू केलेले आंदोलन रात्री उशिरा प्रांत अधिकारी प्रकाश संकपाळ यांनी त्यांच्या मागण्या लेखी स्वरूपात मान्य केल्याने मध्यरात्री एक वाजता स्थगित केले.

पळसदरी येथील कल्पतरू प्रकल्पात अपंग शेतकऱ्यावर अन्याय होत असल्याचा आरोपही सुरेश लाड यांनी केला आहे. त्यांनी मागणी केली आहे की, कल्पतरू कंपनीने



ज्या जमिनी ताब्यात घेतल्या. त्याच्या सीमाबंदीची मोजणी करावी. तसेच, शेतकऱ्यांना वेळ द्यावी आणि अतिक्रमण थांबवावे. विशेषतः वर्णे येथील पांडुरंग शिर्के या शेतकऱ्यावर अन्याय होत असल्याचा मुद्दा लाड यांनी उपस्थित केला

या आंदोलनात सुरेश लाड यांनी कर्जत पोलीस ठाण्याचे निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या मनमानी कारभारावरही टीका केली. त्यांनी विविध प्रकरणांमध्ये अधिकारांचा गैरवापर केल्याचा आरोप केला आहे. भात खरेदी प्रक्रियेत आदिवासी शेतकऱ्यांची लूट कुणी केली? मुस्लिम कब्रस्तानमध्ये पुरलेला मृतदेह खून होता का? युसूफ खान याच्यावर वैयक्तिक राग मनात धरून केलेली कारवाई यासारख्या मुद्द्यांकडेही लाड यांनी लक्ष वेधले.

काल दुपारपासून कर्जत पोलिस ठाण्यात एकच धावपळ उडालेली पाहायला मिळाली. कर्जत भाजपसह अन्य पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. रायगड जिल्हा अप्पर पोलिस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांची मध्यस्थी यशस्वी झाली नाही. रात्री उशिरा प्रांताधिकारी प्रकाश संकपाळ यांनी मागण्या मान्य केल्याचे पत्र दिले. या पत्रात त्यांनी स्पष्ट केले की, जिल्हाधिकारी, अधीक्षक भू अभिलेख रायगड आणि कंपनी प्रशासनातील संपर्क अधिकारी चोरगे यांच्यासोबत चर्चा झाली आहे. त्यानुसार, शेतकऱ्यांनी तत्काळ भू अभिलेख खात्याकडे मोजणीसाठी अर्ज करावा व दोन दिवसांत मोजणी शुल्क भरावे. त्यानंतर विशेष बाब म्हणून संबंधित जमिनीची मोजणी तातडीने करण्यात येईल. मोजणी पूर्ण होईपर्यंत कंपनीला संबंधित शेतकऱ्यांच्या जमिनीवर कुंपणाच्या भिंतीचे बांधकाम न करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या. मध्यरात्री एक वाजता माजी आमदार सुरेश लाड यांनी आपले ठिय्या आंदोलन स्थगित केले.

# बँक ऑफ इंडियाच्या धाटाव शाखेत महिलेच्या हातातील १५ हजार रुपये लंपास

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धाटाव बँक ऑफ इंडिया या शाखेत भरदिवसा एक धकादायाक प्रकार गुरुवारी घडाला असुन चक्क चोरट्याने हात चलाखी दाखवत एका महिलेच्या हातातील खराब नोटा असल्याचा बहाना दाखवत पंधरा हजार रुपये लंपास केले.

बँकेत सुरक्षा रक्षक असून सुद्धा चोरी होतेच कशी असा सामान्य नागरिक थेट सवाल उपस्थित करीत आहे त्यामुळे ग्राहकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. ग्राहकांच्या मनात भीतीचे वातावरण पसरलेले आहे . अज्ञात इसमाने एका महिलेचे फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञात इसमाविरोधात रोहा पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झालेला आहे.

## अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल

दरम्यान लांढर गावातीला संगीता संजय ताम्हणकर या पतीच्या पायाच्या ऑपरेशन साठी पैसे काढण्यासाठी धाटाव मधील बँक ऑफ इंडिया शाखेत गेल्या होत्या . स्वतःच्या बचत खात्यातील चेक द्वारे ५५००० हजार काढले असता त्यांनी कॅश काउंटर शेजारीच पैशांच्या नोटा मोजत असताना एका फुल हाताचा सफेद व निळ्या रंगाचा चेक्स शर्ट घातलेल्या एका अज्ञात इसमाने विचारले की तुम्ही पैसे पर्समध्ये का ठेवताय त्यातील तीन नोटा खराब आहेत . माझ्याकडे या नोटा द्या मी त्यातील खराब नोटा बाहेर बदलून काढण्यासाठी देतो असा बहाना करून त्या चोरट्याने त्यातील पैशांचा एक बंडल आपल्या हातामध्ये घेतला व हातचलाखीने या चोरट्याने त्यातील चक्क १५००० रुपये आपला खिशात भरले बाकीच्या नोटा या महिलेच्या हातात देत असताना सांगितले की, यातील काही खराब नोटा आहेत त्या कॅश काउंटर कडून तुम्ही बदलून घ्या असे सांगून तो चोरटा साथीदाराला घेऊन लंपास झाला.

काही अवधीनंतर त्या महिलेच्या लक्षात आलं की यातील काही ३० पाचशे रुपयांचा नोटा गायब आहेत . महिलांनी आरडाओरडा करण्यापूर्वीच चोरटा निघून गेला होता. महिलेची फसवणूक केल्याप्रकरणी रोहा पोलीस स्टेशनमध्ये अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पदभार स्वीकारला

**नवी मुंबई : बातमीदार**

कोकण विभागीय आयुक्त पदाचा डॉ. विजय



सूर्यवंशी यांनी पदभार स्विकारला असून आज सर्व विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची आाढावा बैठक घेऊन कोकण विभागातील कामकाजाचा आढावा घेतला.

डॉ. विजय सूर्यवंशी यापूर्वी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या आयुक्त पदावर कार्यरत होते. डॉ. सुर्यवंशी हे सन २००६ च्या भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी आहेत. त्यांचे शालेय शिक्षण सातारा सैनिक शाळा तसेच नाशिक जिल्हयातील देवळा येथील जिल्हा परीषदेच्या शाळेत झाले आहे. पुढे पी.एच.डी. (व्यवस्थापन), एम.बी.ए.(मार्केटिंग), एल.एल.बी., बी.एस.सी. (फिजिक्स) असे उच्च शिक्षण पूर्ण करुन त्यांनी दि.०९ मार्च २०१२ रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ, मुंबई येथे सह मुख्यकार्यकारी अधिकारी या पदावर रुजू होवून प्रशाकीय सेवेत प्रवेश केला.

# आला उन्हाळा, आरोग्य सांभाळा!

■ पनवेल महापालिकेकडून नागरिकांना आवाहन



**पनवेल: रामप्रहर वृत्त**

काही दिवसापासून उन्हाची तीव्रता वाढू लागली असल्याने नागरिकांनी खबरदारी घेणे गरजेचे आहे. येथून पुढील काळात उन्हाळ्याची तीव्रता अधिक वाढणार आहे, त्यामुळे महत्वाच्या कामाशिवाय भर दुपारी उन्हात जाणे नागरिकांनी शक्यतो टाळावे

उन्हाच्या तडाख्यात बाहेरील कोल्ड्रिंक न घेता घरी बनवलेले ताक, दही, लिंबूपाणी, कैरीचे पन्हे, उसाचा रस, पुदिना सरबत नियमित घ्यावीत व भरपूर प्रमाणात पाणी प्यावे. उन्हाळ्यात सहज मिळणारी व पाण्याचे प्रमाण जास्त असणाऱ्या रसदार फळांचे सेवन करावे.

उन्हामुळे तापमान वाढून शरीरातील पाण्याचे प्रमाण वारंवार कमी होत असते. दुपारी १२ ते ३ उन्हात जाणे शक्यतो टाळावे.

रसदार फळांचे सेवन करावे. उन्हामुळे तापमान वाढून शरीरातील पाण्याचे प्रमाण वारंवार कमी होत असते. दुपारी उन्हात शेतीत कष्टाची कामे टाळावीत. उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस अधिक वाढू लागली आहे. त्यामुळे नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी असे आवाहन महापालिकेच्यावतीने आयुक्त.मंगेश चितळे यांनी केले आहे.

**काय घेऊ नये**

जंक फूडमध्ये फॅट्सचे प्रमाण जास्त, पचायला कठीण यामुळे वजन वाढते,

**मांसाहार:** पचनास जड असल्याने मांसाहार टाळावा.

**मसाल्याचे पदार्थ:** उष्ण असल्याने मसाले अतिप्रमाणात वापरणे टाळावेत.

**कोल्ड्रिंक्स:** शरीराला अपायकारक असल्याने सेवन कमी प्रमाणात करावे. तसेच चहा-कॉफीचेही प्रमाण कमी करावे.

**उन्हात उपाशीपोटी घराबाहेर पडल्यास चक्कर तसेच सनस्ट्रोक होण्याची भिती असते. त्यामुळे नागरिकांनी उपाशीपोटी घराबाहेर पडू नये. तसेच सतत पाणी पिणे आवश्यक आहे. त्यासाठी पाण्याची बाटली सोबत ठेवा. शक्यतो पूर्ण बाही असलेले सुती कपडे घातल्यास घामाचा परिणाम होत नाही. त्वचेला उष्णतेपासून वाचवण्यासाठी सनस्क्रीन, उन्हामध्ये चांगल्या दर्जाचा गॉगल वापरावा, टोपीचा देखील वापर करावा. दुपारी १२ ते ३ वाजेच्या दरम्यान उन्हाचा पारा जास्त असतो.त्यामुळे या काळामध्ये घराच्या बाहेर पडणे टाळावे.**

**-डॉ.आनंद गोसावी मुख्य वैद्यकीय अधिकारी, पनवेल महानगरपालिका**

### हे आहे फायदेशीर

- कडुनिंबाची पाने किंवा लिंबाचा रस अंघोळीच्या पाण्यात टाकल्याने त्वचारोगापासून रक्षण होते.
- पुदिना चटणी, कैरीची चटणी, कढीपत्ता चटणी, कोशिंबीर, लोणचे, असे तोंडी लावायचे पदार्थ जेवणात वापरावे.

दैनंदिन आहारात कांदा, कैरी, टोमॅटो, काकडी आदींचासमावेश करावा.

फिकट व पांढऱ्या रंगाचे सैल कपडे वापरावेत.

### हे आहेत थंड पदार्थ



कलिंगड, सफरचंद, चिकू, लिंबू, कांदा, पालक, टोमॅटो, गोबी, गाजर, मुळा, कोथिंबीर, पुदिना, भेंडी, बीट, डाळिंब, उसाचा रस, नारळ पाणी, मीठ, मूग डाळ, शेवगा,

पान १ वरुन

## मराठीने मानवी विचारांना व्यापक बनवले

आज जागतिक मातृभाषा दिवस आहे. तुम्ही दिल्लीतील साहित्य संमेलनासाठी दिवससुद्धा अतिशय चांगला निवडला आहे. मी जेव्हा मराठी भाषेबाबत विचार करतो तेव्हा मला संत ज्ञानेश्वर महाराजांची एक ओवी आठवते. माझ्या मराठीची बोलू कौतुके। परि अमृतातेहि पैजासी जिंके. म्हणजे मराठी भाषा ही अमृताहूनी गोड आहे. त्यामुळे मराठी भाषेच्या प्रति माझं प्रेम आहे. मी मराठी बोलण्याचा प्रयत्न नेहमी केला आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

मराठी एक संपूर्ण भाषा आहे. मराठीत शूरताही आहे आणि वीरताही आहे. मराठीमध्ये सौंदर्यही आहे आणि संवेदनाही आहे. समानताही आहे आणि समरसताही आहे. यात अध्यात्माचे स्वरही आहे आणि आधुनिकताही आहे. मराठीत भक्तीही आहे, शक्तीही आहे आणि युक्तीही आहे, असे म्हणत पंतप्रधान मोदींनी मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित केले.

जगभरात १२ कोटीहून अधिक लोक मराठी भाषा बोलतात. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवा यासाठी कोट्यवधी लोक दशकांपासून वाट पाहत होते. काही महिन्यांपूर्वी अभिजात भाषेचा दर्जा देण्याचे कार्य माझ्या हातून झाले. हे मी माझे भाग्य समजतो, असे पंतप्रधान मोदींनी नमूद केले.

पंतप्रधान मोदी यांनी 'छावा' चित्रपटाचा उल्लेख करताच दिल्लीच्या विज्ञान भवनात टाळ्यांचा कडकडाट करत उपस्थितांनी दाद दिली. यानंतर पंतप्रधान मोदी म्हणाले, छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याचा परिचय शिवाजी सावंत यांच्या 'छावा' या कांदबरीने करून दिला. मराठीचा जेव्हा जेव्हा विषय येतो तेव्हा मुंबई आणि चित्रपटांचा विषय आल्याशिवाय राहत नाही. मुंबईनेच मराठी आणि हिंदी चित्रपटांना उभारी दिली. आता तर 'छावा'ची धूम आहे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

# अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिबिरात ६० जणांचे रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ कर्जत अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व मेकॅनिकल विद्यार्थी असोसिएशनच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ६० रक्तदात्यांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले हे कर्जत - खालापुर तालुक्यातील ५०९ वे रक्तदान शिबीर ठरले.

समर्पण रक्त केंद्र घाटकोपरच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी उपप्राचार्य राजकुमार नारखेडे, प्रा. संजय पाटील, प्रा. प्रविण नेरपगार, प्रा. गणेश दरवणकर, प्रा. दिनेश तरे, प्रा. पी. एम.देशपांडे, प्रा. सोनल पाटील, प्रा. दिपाली केसकर, प्रा.शब्बीर कर्जतवाला, प्रा. दुराज तिवारी, मंगेश वझरेकर,अनिल घरत, सुनिल लाड, किरण पाटील आदी उपस्थित होते.

रक्त संकलनाचे काम समर्पण रक्त केंद्राचे डॉ. रमेश सिंग, लता देशक, धनश्री लाड, शिला वाघमारे, राजेश सोळंकी, दिनेश सरदार आदींनी केले. या शिबिरात ६० रक्तदात्यांनी रक्तदान केले.



# गुरे चोरी करणारी टोळी गजाआड

## पनवेल तालुका पोलिसांच्या पथकाची कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका परिसरात गुरे चोरी करणार्या सराईत टोळीला पनवेल तालुका पोलिसांनी गजाआड केल्याने त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात पनवेल, उरणसह इतर विभागातील गुन्हे उघडकीस आणण्यात यश मिळाले आहे.

तालुक्यात राहणारे अभिदास गायकर यांच्या घरासमोर बांधून ठेवलेले दोन बैल अज्ञात इसमांनी फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने चोरी करुन नेल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल होताच

आरोपीच्या वर्णनाव्यतिरिक्त इतर कोणताही धागादोरा नसतांना वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. अनुरुध्द गिजे, पोउपनि. हर्षल राजपुत व गुन्हे प्रकटीकरण पथकाने तांत्रीक तपास व सीसीटीव्ही फुटेजचे आधारे आरोपी सलमान उर्फ राजा करीम शेख, (रा. तळोजा) व तारीक यासीन कुरेशी, (रा.



कौसा,मुंब्रा) येथून ताब्यात घेवून तसेच तांत्रीक तपासामध्ये इतर आरोपी हे जिल्हा नांदेड येथे असल्याची माहिती प्राप्त झाल्याने सपोनि गिजे व तपास पथकाने नांदेड येथे जावून आरोपी फरहान हनीफ बुबेरे, (रा.तळोजा) तसेच उवेष उर्फ ओवेस शकील कुरेशी, वय १९ वर्षे (निजामपुरा, भिवंडी) यांना ताब्यात घेण्यात आलेले आहे.

यापुर्वी पनवेल व उरण परिसरात अशा प्रकारचे गंभीर गुन्हे केल्याची स्वखुशीने कबुली दिली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने तळोजा पोलीस ठाणे, उरण पोलीस ठाणे, रोहा पोलीस ठाणे, विष्णूनगर पोलीस ठाणे डोंबिवली, पोयनाड पोलीस ठाणे, बाजारपेठ पोलीस ठाणे कल्याण, खालापूर पोलीस ठाणे, पेण पोलीस ठाणे, नागोठणे, डायघर पोलीस ठाणे आदी ठिकाणी त्यांच्या विरोधात मोठ्या प्रमाणात अशा प्रकारचे गुन्हे दाखल आहेत.


सदरची यशस्वी कामगिरी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पनवेल प्रशांत मोहिते, सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग अशोक राजपुत यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन व दिलेल्या सुचनांमुळे अशा प्रकारचे गंभीर स्वरुपाचे गुन्हे करणा-या टोळीचा बिमोड करण्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) आनंदा कांबळे, गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे सहा. पोलीस निरीक्षक अनुरुध्द गिजे, पोलीस उप निरीक्षक हर्षल राजपुत, पोहवा विकास साळवी, सोमनाथ रणदिवे, विजय देवरे, महेश धुमाळ, सुनिल कुदळे, सतिश तांडेल, शिवाजी बाबर, वैभव शिंदे, पोशि राजकुमार सोनकांबळे, आकाश भगत, विद्या गायकवाड, भिमराव खताळ यांनी पार पाडलेली आहे.

# पनवेल मनपाकडून महिलांना वाहन चालविण्याचे मोफत प्रशिक्षण

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेने यंदाच्या आर्थिक वर्षात महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'गुलाबी अर्थसंकल्प' या संकल्पनेंतर्गत अनेक उपक्रम हाती घेतले. याच उपक्रमापैकी महापालिका क्षेत्रात राहणार्या मुली व महिलांना चारचाकी वाहन चालविण्याचे प्रशिक्षण तसेच प्रशिक्षणानंतर संबंधित महिलांना वाहन चालकाचा शिकाऊ परवाना काढून देण्यासाठी प्रशिक्षण संस्था नेमण्याच्या हालचाली पालिकेत सुरू झाल्या आहेत. तब्बल एका लाखांहून अधिक महिलांना महापालिकेच्या या योजनेचा लाभ मिळू शकेल.

पनवेल महापालिकेमध्ये सर्वाधिक महिला वाहन चालक निर्माण करण्याचा पालिकेचा हा प्रयत्न आहे. हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत राहणार आहे. सर्वाधिक स्वमालकीची वाहने असलेले शहर म्हणून पनवेलची ओळख आहे. पनवेल महापालिका क्षेत्रात पनवेल शहर, खारघर, कामोठे, कळंबोली, तळोजा,



नवीन पनवेल, खांदेश्वर ही उपनगरे आहेत. ९ लाख लोकवस्तीच्या महापालिका क्षेत्रात महिला आणि तरुण मुलींची (१८ वर्षांवरील) संख्या तीन लाखांवर आहे.

आपत्तीवेळी प्रत्येक महिलेला किमान वाहन चालविता आले पाहिजे या उद्देशाने पनवेल महापालिकेचे तत्कालिन आयुक्त गणेश देशमुख यांनी महिला सक्षमीकरणाच्या योजनेसाठी महिला व बालकल्याण विभागाच्या लेखाशिर्षकाखाली या योजनेसाठी २५ लाखांची तरतूद केली.यंदा आर्थिक वर्षात विद्यमान पालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी शहरातील महिलांच्या सक्षमीकरणाला चालना देण्यासाठी बुधवारी याबाबतची निविदा जाहीर करुन महिलांना प्रशिक्षण देणार्या संस्थांकडून त्यांचे दरपत्रक मागविले आहे.

**ही योजना राबविण्यासाठी सध्या वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देणार्या संस्था निवडीची प्रक्रिया सुरू आहे. ही प्रक्रिया अंतिम झाल्यावर महापालिकेतील सर्वच प्रभाग स्तरावर याबद्दल महिलांकडून अर्ज मागवले जातील. त्यानंतर प्रत्यक्षात वाहन चालविण्याचे प्रशिक्षण आणि प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर शिकाऊ वाहन चालविण्याचा परवाना संबंधित प्रशिक्षण संस्थेकडून काढून दिले जातील. जास्तीत जास्त महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा.**
**-कैलास गावडे, अतिरिक्त आयुक्त, पनवेल महापालिका**

प्रशिक्षण देणार्या संस्था व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी पात्र असाव्यात तसेच प्रादेशिक परिवहन विभागाकडे त्या नोंदीत असतील या निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार आहे.

# ग्रीन आर्मी प्रोग्राममधून 'सीकेटी'च्या विद्यार्थ्यांचा पर्यावरण संवर्धनात सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ऑगस्ट २०२४मध्ये सुरू झालेल्या सीकेटी विद्यालय इंग्रजी माध्यमिक विभागात लर्निंग लिंक्स फाउंडेशन (एलएलएफ) च्या सहकार्याने (एसएलबी)च्या पुढाकाराने ग्रीन आर्मी प्रोग्राम राबविण्यात आला हा कार्यक्रम पर्यावरणा संदर्भात जागरूकता जोपासणे तसेच जागरूक तरुण नेते निर्माण करणे यासाठी आयोजित करण्यात आला होता.

टिकाऊपणासाठी ज्ञान आणि साधनांसह विद्यार्थ्यांना सक्षम बनविणे,याचा एक भाग म्हणून, कचरा व्यवस्थापन,प्रदूषण आणि हवामान बदल यासारख्या गंभीर



पर्यावरणीय विषयांवर साप्ताहिक सत्रांमध्ये इयत्ता ६ वी आणि ७ वी मधील १३५ विद्यार्थ्यांनी सक्रियपणे सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे जागरूकता रॅली, जिथे विद्यार्थ्यांनी जबाबदार नागरिक बनून कचरा विल्हेवाट लावण्याचा संदेश आणि ग्लोबल वार्मिंग कमी करण्याचे आवाहन दिले.

विद्यार्थ्यांनी प्लास्टिक कलेक्शन करून, ३ आर - रिडेस, रीयूज आणि रीसायकलशी त्यांची वचनबद्धता दर्शविली. त्यांच्या या प्रयत्नांबद्दल कौतुक म्हणून विद्यार्थ्यांना पुनर्वापर केलेल्या पिशव्या मिळाल्या. हा उपक्रम केवळ टिकाऊपणाचे महत्त्वच मजबूत करत नाही तर सहभागास प्रोत्साहित करतो.

# गुलाबपुष्प देऊन परीक्षार्थींचे स्वागत

**उरण : प्रतिनिधी**

शिक्षण मंडळाच्या वतीने ,घेण्यात येणाऱ्या एस.एस.सी परीक्षेला २१ फेब्रुवारी पासून सुरुवात झाली चिरनेर परीक्षा केंद्रातून मराठी माध्यमाचे २०२ परीक्षार्थी विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले आहेत.

पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या संचालक अर्चना ठाकूर, मुख्याध्यापक मिलिंद पट्टेबहादूर तसेच अन्य शिक्षकांनी गुलाब पुष्प देऊन परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. परीक्षा केंद्र संचालक किशोर भोईर व परीक्षा उपकेंद्र संचालक आनंद चिर्लेकर यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सर्व शिक्षक सहकार्य करीत आहेत. परीक्षा केंद्रांवर परीक्षेच्या पहिल्याच दिवशी, अनेक पालकांनी,विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी सकाळपासूनच गर्दी केली होती.

# पनवेल परिसरात भिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात गेल्या काही महिन्यांपासून अचानकपणे परराज्यातील भिकारी येथे वास्तव्यास आले असून त्याचा मोठ्या प्रमाणात नाहक त्रास पनवेलकरांना सहन करावा लागत आहे. तरी पनवेल महानगरपालिकेने त्यांच्या विरोधात कारवाई करावी अशी पनवेलकरांची मागणी जोर धरु लागली आहे.

गेल्या काही महिन्यापासून पनवेल परिसरात असलेले विविध धार्मिक स्थळे, महामार्गावरील सिग्नल, विविध नाके, एस.टी.स्टॅण्ड, रेल्वे स्टेशन, बाजारपेठा आदी ठिकाणी अचानकपणे भिकारी वाढू लागले आहेत. यातूनच छोट्या मोठ्या चोर्या सुद्धा वाढीस लागल्या आहेत.

भर उन्हात अनेक वेळा लहान मुलांना कडेवर घेवून महिला व पुरुष भिक मागताना दिसत आहेत. अनेक वेळा हे भिकारी रस्त्यातच झोपून राहतात किंवा प्रांतःविधी करतात. त्यामुळे आरोग्याचा प्रश्न सुद्धा निर्माण झाला आहे. याकडे महानगरपालिकेने गांभीर्याने पाहून भिकारी सफाई मोहिम राबवावी व त्यांना भिक्षेकरी गृहात पाठवावेत, अशी मागणी जोर धरु लागली आहे.

# पर्यायी मार्गाच्या वापराचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सायन-पनवेल हायवेवरील उरणफाटा ब्रीज उतरताना मुंबई लेनवरील रस्त्याच्या क्रॉक्रीटीकरणाचे काम २२ फेब्रुवारी ते २२ मार्चदरम्यान सुरू असणार आहे.

सदर कालावधीमध्ये पुणेकडुन मुंबईकडे येणारी वाहने पनवेल एक्झीट अटलसेतु मार्गे मुंबईकडे जातील. कळंबोली मार्गे येणारी वाहने सीबीडी ब्रीज खालुन डावीकडे वळुन किल्ला जंक्शन पामबीच मार्गे मुंबई कडे जातील. पुण्यावरून ठाणेकडे जाणारी वाहने कळंबोली सर्कल, कोन फाटा मार्गे ठाणेकडे जातील. नागरिकांनी नवी मुंबई पोलीसांना सहकार्य करावे. असे आवाहन वाहतूक विभाग नवी मुंबई पोलीस यांचेकडून करण्यात येत आहे.

# सीकेटी कॉलेजच्या विद्यार्थ्यांची बॉम्बे स्टॉक एक्सचेंजमध्ये लाईव्ह टर्मिनलला शैक्षणिक भेट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालया तर्फे १८ फेब्रुवारी रोजी तृतीय वर्ष , वाणिज्य (लेखा व वित्त) विद्यार्थ्यांची बॉम्बे स्टॉक एक्सचेंज मध्ये लाईव्ह टर्मिनल अभ्यासासाठी, फिरोज जीजीभॉय टॉवर्स, दलाल स्ट्रीट , काळा घोडा, फोर्ट, मुंबई, येथे शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांना शेअर मार्केट, म्युच्युअल फंड गुंतवणूक आणि डेरिव्हेटिव्ह मार्केटमधील गुंतवणूक समजून घेता येईल, स्टॉक मार्केट ऑपरेशन, डेरिव्हेटिव्ह मार्केट आणि मूलभूत विश्लेषणाचे ज्ञान घेता येईल तसेच शेअर बाजारातील व्यापार कौशल्य समजून घेता येईल व स्टॉक मार्केटच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करता यावा हा उद्देश होता. यावेळी बॉम्बे स्टॉक एक्सचेंज फोरमचे, वित्त आणि ऑपरेशन्सचे प्रमुख युनूस कुरेशी यांनी विद्यार्थ्यांना शेअर मार्केट, म्युच्युअल फंड गुंतवणूक आणि डेरिव्हेटिव्ह मार्केट याबद्दल सविस्तर माहिती दिली.

या मध्ये १०७ विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शीवला.लेखा व वित्त विभाग, प्रमुख प्रा. डॉ. निलेश कोळी, प्रा. मनोज सुपेकर, प्रा. अलोक भानुशाली आणि प्रा. मोनिका भालेराव यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सकल मराठा समाज मंडळ खांदा कॉलनीतर्फे शिवजयंती उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**

सकल मराठा समाज मंडळ, खांदा कॉलनी आयोजित शिवजयंती उत्सव मोठ्या आनंदात आणि उत्साहात संपन्न झाला. पाच दिवस चाललेल्या या उत्सवात विविध सामाजिक, सांस्कृतिक व कला उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

उत्सवाची सुरुवात महिलांसाठी हळदीकुंकू समारंभाने झाली. या समारंभात डॉ. नैना पटेल यांनी महिलांच्या आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. नागरिकांसाठी आयोजित करण्यातआलेल्या शिबिरात वाईट लोटस इंटरनॅशनल हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी सेवा दिली. कच्छ युवक संघ,



पनवेल यांच्या माध्यमातून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये ६८ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक योगदान दिले.

सायंकाळी महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा जपणारा पोवाडा व मराठी गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. आमदार प्रशांत ठाकूर यांनी या सांस्कृतिक कार्यक्रमाला भेट दिली. सलग चौथ्यांदा निवडून आल्याबद्दल त्यांचा सत्कार मंडळातर्फे करण्यात आला.

# विद्यार्थ्यांनी अनुभवला अग्निशमन प्रक्रियेचा थरार

## कळंबोलीतील न्यू मुंबई इंग्लिश स्कूलचा शैक्षणिक उपक्रम

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोलीतील न्यू मुंबई इंग्लिश स्कूलने सोमवारी सकाळी कळंबोलीतील अग्निशामक दल यंत्रणेला भेट देऊन कामकाजाची माहिती घेऊन अग्निशमन करतानाचा थरार अनुभवला. या वेळी मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडके व उप अग्निशमन अधिकारी मनिष ग्यानीराम ब्राम्हणकर यांनी शालेय विद्यार्थ्यांना अग्निशमन यंत्रणेची माहिती दिली.

शासनाच्या निर्देशानुसार शाळेतील विद्यार्थ्यांना समाजातील विविध क्षेत्रातील कामकाजाची जवळून माहिती व्हावी, कामकाज कसे चालते, एखाद वेळेस जर कोणतीही घटना घडली तर त्याबाबत सजग राहून कोणती उपाययोजना करावी याचे धडे देण्याची सूचना शासनाच्या



वतीने दिलेली आहे. याचाच एक भाग म्हणून कळंबोलीतील न्यू मुंबई इंग्लिश स्कूल मधील शिकणाऱ्या तब्बल ६० विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष संतोष बैजनाथ शुक्ला यांनी कळंबोलीतील अग्निशामक दल विभागाला भेट देऊन त्याची माहिती दिली.

या वेळी कळंबोलीतील अग्निशामक दलातील प्रमुख अधिकारी प्रवीण बोडके तसेच उप आधिकारी मनीष ब्राह्मणकर तसेच अन्य अग्निशामक सुरक्षा दलाच्या जवानांनी विद्यार्थ्यांना आपत्कालीन व्यवस्थेमध्ये कशा प्रकारे आगीवर किंवा अन्य घटनेवर नियंत्रण मिळवले जाते याची प्रात्यक्षिक करून माहिती दिली.

या वेळी बोलताना कळंबोली अग्निशामक दल प्रमुख मनीष ब्राह्मणकर म्हणाले की, शालेय विद्यार्थ्यांना अग्निशामक यंत्रणे बाबत माहिती देताना आम्हालाही खूप चांगले वाटले. विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना उत्तरे देऊन आम्हालाही समाधान प्राप्त झाले. आजचे विद्यार्थी हे भावी आयुष्यातील सजग नागरिक असणार असल्याने त्यांना ही माहिती उपयुक्त आहे.

# कायदा कोणीही हातात घेऊ नये; शांतता राखावी -अशोक राजपूत

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलकरांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. एखादी घटना घडल्यास त्यांनी नजिकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. कोणीही कायदा हातात घेवू नये, सर्व समाजात शांतता कशी राहील यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन परिमंडळ २ चे सहा. पो.आयुक्त अशोक राजपूत यांनी घेतलेल्या बैठकीत केले.

या बैठकीला वपोनि नितीन ठाकरे यांच्यासह विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते व विविध संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त पनवेल शहरात एक प्रसंग घडत असताना सदर ठिकाणी तात्काळ पोलीस पोहोचल्याने पुढील अनर्थ टळला. अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू



नयेत यासंदर्भात नागरिकांना आवाहन करताना अशोक राजपूत यांनी सर्व समाजात सलाखो कसा राहील यासाठी सर्वांनी उत्स्फूर्तपणे पुढे यावे, अनुचित प्रकार घडत असल्याने तात्काळ त्यांनी संबंधित पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

याबाबत पनवेल महापालिकेच्या संबंधित अधिकार्यांना सुद्धा सुचना देणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पनवेल परिसरातील बांगलादेशीयांचा प्रश्न, आवश्यक त्या परवानग्या न घेता चालविणारे रिक्षा चालक, वाढती बेकायदेशीर अतिक्रमणे व वस्त्या या संदर्भात सुद्धा पोलीस लक्ष ठेवून असून संबंधित ठिकाणी सुद्धा कारवाई करण्याचे ठोस आश्वासन यावेळी दिले आहे.

या बैठकीला मार्गदर्शन करताना वपोनि नितीन ठाकरे यांनी सांगितले की, बांगलादेशी मुक्त पनवेल शहर करण्यासाठी अभियान राबविण्यात येत असून लवकरच पनवेल बांगलादेशी मुक्त शहर झाल्याचे दिसून येईल.

# पोलीस ठाण्यातर्फे नवीन कायदे, सायबर जनजागृती

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या माध्यमातून पनवेल येथील बी.पी.मरिन ॲकॅडमी येथे असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नवीन कायदे व सायबर जनजागृती कार्यक्रम झाला.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड. संपत गवळी यांनी नवीन कायद्यांविषयी मार्गदर्शन केले. तसेच पो.नि.अभिजीत अभंग यांनी पोलीस जनता समन्वय म्हणून मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे पोउपनि. अभय कदम यांनी सायबर क्राईम व नवी मुंबई व्हाटस्अप चॅनल याबाबत माहिती दिली. पोउपनि. अंकुश शेलार यांनी अंमली पदार्थ विरोधी कायदे संदर्भात माहिती दिली. यावेळी बी.पी.मरिन ॲकॅडमीचे विद्यार्थी,शिक्षक,कर्मचारी उपस्थित होते

## संपादकीय

# सारस्वतांचा मेळा!

साहित्य संमेलन म्हटले की वाद आलाच. या शिरस्त्याचे पालन यंदाही होतेच आहे. मराठी भाषा, साहित्य व तिच्या संस्कृतीचे सौंदर्य जगासमोर यावे यासाठी खरे तर साहित्य संमेलनाचे आयोजन होते, परंतु हा हेतू बाजूला राहून संमेलनात राजकीय नेत्यांचा वावर खूपच दिसत असल्याचा टीकेचा सूर यंदाही आहेच. वास्तविक, सरकारी सहकार्याविना राजधानी दिल्लीत मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन सोपे नाही हेही तितकेच खरे आहे.

**गेले काही महिने चर्चिले जात असलेले ९८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सध्या राजधानी दिल्लीतील तालकटोरा स्टेडियमवर भरले आहे. शुक्रवारी दुपारी विज्ञान भवनात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले. आजपासून तीन दिवस संमेलन चालेल. तब्बल बहात्तर वर्षांनंतर पुन्हा एकदा यमुनेच्या तीरावर मराठी सारस्वतांचा मेळा भरला आहे. अर्थात, दिल्लीत होणारे हे दुसरे मराठी साहित्य संमेलन आहे. यापूर्वी १९५४ साली राजधानीत पार पडलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते झाले होते. यंदाच्या संमेलनासाठी मराठी सारस्वतांसोबतच देश-विदेशातील साहित्यरसिकही मोठ्या संख्येने उपस्थित आहेत. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी डॉ. तारा भवाळकर आहेत तसेच संमेलनाचे स्वागताध्यक्ष ज्येष्ठ राजकीय नेते शरद पवार व प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही उपस्थित आहेत. आपल्या मायमराठीला अभिजात भाषेचा दर्जा गेल्याच वर्षी प्राप्त झाला असून त्यानंतर होणारे हे पहिलेच साहित्य संमेलन आहे. अभिजात दर्जामुळे मराठी भाषेच्या संदर्भात नेमके काय बदलणार आहे, याविषयी या संमेलनात चर्चा होईल अशी अपेक्षा आहे. राजधानीतील या संमेलनाच्या आयोजनासाठी केंद्र आणि राज्य सरकारमधील यंत्रणांनी योगदान दिले आहे. त्यामुळेच संमेलनात राजकीय नेतेमंडळींचा वावर दिसतो आहे. वास्तविक मराठी साहित्यिक विश्व आणि राजकीय नेतेमंडळी यांच्यातील जवळीकही जुनीच आहे. संमेलनाच्या आयोजनात राजकारणातील दिग्गजांनी नेहमीच सहभाग घेतला आहे, परंतु तरीही दरखेपेला राजकीय सहभागावर आक्षेप नोंदवला जातोच. साहित्यिक मंचावर राजकीय नेतेमंडळी कशासाठी असे या आक्षेपाचे स्वरूप असते. यंदाही हा प्रश्न आहेच. वास्तविक आपल्याकडे तसेच जगभरातील अन्य कित्येक देशांमध्ये राजकीय नेत्यांचे साहित्यही गाजले आहेच. राजकारण्यांनाही साहित्याची आवड असू शकते हे तरी मान्य करावेच लागेल. दरवर्षी वाद निर्माण होत असला तरी राजकीय नेत्यांचा सहभाग पूर्णपणे नाकारण्याची मागणी मात्र कुणीही करत नाही, हेही तितकेच खरे, कारण त्यातून येणाऱ्या आर्थिक मदतीच्या आधाराविनाही चालणार नसतेच. मराठी साहित्य संमेलन सुरू झाले तेव्हापासूनच या साऱ्याबद्दल प्रश्न उपस्थित केले गेले आहेत, परंतु संमेलनाशी जोडलेल्या अभिजनांनी त्यास उत्तर देण्याची जबाबदारी फारशी कधी मानलेली नाही. त्यामुळे अभिजनांचा आपापसातला सोहळा अशी टीकाही संमेलनावर वर्षानुवर्षे होत आली आहे. यंदाही नेहमीप्रमाणे तोही राग आळवला जाईलच. हा मंच साहित्यिक आहे याचे भान तेवढे सर्वांनीच पाळणे निश्चितच आवश्यक आहे. यंदा मराठी संमेलनाची तुलना जयपूर लिटफेस्टशी होतानाही दिसते आहे. त्या साहित्य सोहळ्याचे पंचतारांकित उच्चभ्रू स्वरूप मराठीजनांना फारसे पचनी पडत नसले तरी मराठी साहित्य संमेलनानेही बदलत्या काळानुरूप थोडेफार आधुनिक स्वरूप घ्यायला कुणाची हरकत नसावी तसेच मराठी भाषेला अधिक समृद्ध करण्यात संमेलनाचा वाटा असला पाहिजे या मागणीबद्दलही कुणाचेच दुमत असणार नाही.**

# रोह्यात रब्बी हंगामात भाजीपाला, कडधान्य लागवड

**खबरबात**
**महादेव सरसंबे**

रोहा तालुक्यात एकेकाळी कुंडलिका नदी व कोलाड पाटबंधारे विभागाच्या कालव्यावर मोठ्या प्रमाणात उन्हाळी भात शेती लावली जात होती, परंतु कालव्याचे पाणी येणे बंद झाल्याने व कमी खर्चात अन्य पिकं येत असल्याने शेतकऱ्यांनी उन्हाळी भात शेतीकडे काही प्रमाणात पाठ केली असून मोठ्या प्रमाणात रब्बी हंगामात तालुक्यातील शेतकरी कडधान्य, भाजीपाला व कलिंगड ही पिके घेण्याकडे वळला आहे.



या पिकातून चांगले उत्पादन रोहा तालुक्यातील शेतकऱ्यांना मिळत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस कडधान्य, भाजीपाला व कलिंगड लागवडीचे क्षेत्र वाढत असल्याचे दिसून येते. या वर्षी रोहा तालुक्यात सरासरी रब्बी क्षेत्र २२५५.०५ हेक्टर सन २०२४२५ साठी असून यंदा क्षेत्र वाढले आहे. यावर्षी रब्बी हंगामात पेरा क्षेत्र २५२६.३० हेक्टर एवढे आहे

शेतकरी घेत असलेले कलिंगड हे पीक स्थानिक बाजारपेठेतसह जिल्ह्याबाहेर मोठ्या प्रमाणात कलिंगड शेतकऱ्यांकडून विकला जात आहे, तर स्थानिक बाजारात वालाच्या शेंगांना मोठी मागणी दिसून येत आहे. सध्या तरी कलिंगड पीक मध्यंतराला आले असल्याचे दिसून येत असून वाल पीकही आता सुस्थितीत आहे.

रोहा तालुक्यात प्रामुख्याने किल्ला, बाहे, म्हसाडी परिसरात मोठ्या प्रमाणात भाजीपाला पीक घेतले जात आहे. यामध्ये प्रामुख्याने वांगी, दुधी, कारली, शिराळे हे पीक घेतले जात आहे. तालुक्याच्या अन्य ठिकाणीही काही प्रमाणात शेतीत व परस बागेत भाजीपाला लागवड शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. तालुक्यातील घोसाळे, भालगाव, मेढा, चणेरा, धामणसई, खांब, सुतारवाडी, कोलाड आदी परिसरात कमी जास्त प्रमाणात भाजीपाला, कडधान्य हे पीक शेतकऱ्यांकडून घेतले जात आहे.

रोहा तालुक्यात भाताचे पीक कमी होत असताना कमी खर्चिक असलेले वालाच्या लागवडीचे क्षेत्र वाढले आहे. मोठ्या प्रमाणात तालुक्यात प्रामुख्याने पडम, खरापटी, निडी, खारगाव, वाशी या प्रमुख परिसरासह तालुक्यातील अन्य ठिकाणी वाल हे पीक घेतले जात आहे. याच पिकाबरोबर मुग,चवळी व बांधावर तूर हे कडधान्य पीक घेतले जात आहे. हे कमी खर्चिक असल्याने व चांगले उत्पादन मिळत असल्याने मोठ्या प्रमाणात या कडधान्याची लागवड तालुक्यात वाढत आहे.

रब्बी हंगामाचा रोहा तालुक्याचा आढावा पाहता भातशेतीचे क्षेत्र कमी होताना दिसत आहे. भात तालुक्यात १६९.४५ हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी भात लावणी करण्यात आली आहे.

कडधान्य पिकामध्ये वाल पिकाचे १८२०.१७ हेक्टर लागवड क्षेत्र आहे. १८२०.१७ या सर्वच क्षेत्रावर पेरणी असुन सर्वच क्षेत्रावर पेरा झालेला आहे. शेंगांमधील दाणे परिपक्व होण्याची अवस्था आहे. या पिकाला कोणताही किडरोग प्रादुर्भाव नाही. हे पीक सुस्थितीत आहे. बाजारात सध्या वालाला चांगला भाव मिळत आहे. पोपटीचा सिझन चालू असल्याने मोठ्या प्रमाणात खवय्ये वालाची पोपटी लावताना दिसत आहेत. चवळी पिकाचे २००.८५ हेक्टर क्षेत्र लागवडीचे आहे. २००.८५ या सर्वच हेक्टर क्षेत्रावर पेरणी असुन सर्वच क्षेत्रावर पेरा झालेला आहे. शेंगांमधील दाणे परीपक्व होण्याची अवस्था आहे. या पिकावर कोणताही किडरोग प्रादुर्भाव नाही. चांगल्या स्थितीतहे पीक आहे. शेंगा बाजारात विक्रीला स्थानिक शेतकरी आणत आहेत.



मुग पिक २००.३८ हेक्टर लागवडीचे क्षेत्र आहे. २००.३८ हेक्टरवर पेरणी असून सर्वच क्षेत्रावर पेरा झालेला आहे. शेंगांमधील दाणे परीपक्व होण्याची अवस्था आहे. कोणताही किडरोग प्रादुर्भाव या पिकावर नाही.

रोहा तालुक्यात भाजीपाला पिकाचे क्षेत्र वाढत आहेत. यामध्ये प्रामुख्याने वांगी पिकाचे १४.९० हेक्टर लागवड क्षेत्र आहे. १४.९० हेक्टर पेरणी असुन क्षेत्रावर पेरा झालेला आहे. फळे काढणी अवस्था आहे. कोणताही किडरोग प्रादुर्भाव नाही. मिरची पिकाचे ४०.५१ हेक्टर क्षेत्र आहे. ४०.५१ हेक्टर वर पेरणी असुन सर्वच क्षेत्रावर पेरा झालेला आहे. फळे काढणी अवस्था आहे. कोणताही किडरोग प्रादुर्भाव नाही.

फळभाज्यामध्ये घोसाळी पिकाचे १०.२५ हेक्टर. क्षेत्र लागवडीचे आहे. १०.२५ हेक्टर क्षेत्रावर पेरणी असून सर्वच क्षेत्रावर पेरा झालेला आहे. फळे काढणी अवस्था आहे. या पिकावर कोणताही किडरोग प्रादुर्भाव नाही. सर्वात जास्त लागवड कारल्याची केली जाते. कारली पिकाचे ९६.१५ हेक्टर क्षेत्र लागवडीचे आहे. ९६.१५ हेक्टर क्षेत्रावर पेरणी असून सर्वच क्षेत्रावर पेरा झालेला आहे. फळे काढणी अवस्था आहे. या पिकावर कोणताही किडरोग प्रादुर्भाव नाही.

भेंडी पीक २०.३४ हेक्टर लागवडीचे क्षेत्र आहे. २०.३४ हेक्टर पेरण असून सर्वच क्षेत्रावर पेरा झालेला आहे. फळे काढणी अवस्था आहे. कोणताही किडरोग प्रादुर्भाव या पिकावर नाही. टोमॅटो पिक १०.३४ हेक्टर लागवडीचे क्षेत्र आहे. १०.३४ हेक्टर क्षेत्रावर पेरणी असून सर्वच क्षेत्रावर पेरा झालेला आहे. फळे काढणी अवस्था आहे. कोणताही किडरोग प्रादुर्भाव या पिकावर नाही.

काकडी पिकाचे १५.४४ हेक्टर क्षेत्र लागवडीचे आहे. १५.४४ हेक्टर क्षेत्रावर पेरणी असून सर्वच क्षेत्रावर पेरा झालेला आहे. फळे काढणी अवस्था आहे.कोणताही किड रोग प्रादुर्भाव या पिकावर नाही. सध्या मिरची, टोमॅटो, कारली, शिराळी, भेंडी, वाल, कलिंगड, चवळीच्या शेंगा विक्रीस आलेल्या दिसून येत आहे.

रोहा तालुक्यात सर्वात जास्त वाढत असलेले पीक म्हणजे कलिंगड होय. कलिंगड लागवड मोठ्या प्रमाणात रोहा तालुक्यात होताना दिसत आहे. या रब्बी हंगामात कलिंगड पिक ११०.६ क्षेत्र आहे.११०.६ हेक्टर पेरणी असून या सर्वच क्षेत्रावर पेरा झालेला आहे. फळे काढणी अवस्था आहे. कोणताही किडरोग प्रादुर्भाव नाही. मोठ्या प्रमाणात कलिंगड स्थानिक बाजारपेठेसह जिल्ह्याबाहेर, मुंबई, पुणे अन्य राज्यासह परदेशात रोहा तालुक्यातून कलिंगड विक्रीला जाताना दिसत आहे. चांगले उत्पादन कलिंगडाचे येताना दिसत आहेत. सर्वत्र मगर बंधूंचे कलिंगड प्रसिद्ध आहेत. रोहा तालुक्यातील वाशी येथील अनंत मगर व नथुराम मगर हे शेतकरी कलिंगड लागवडीसाठी प्रसिद्ध आहेत.

दरम्यान, रोहा तालुक्यात चालू वर्षी कडधान्ये, कलींगड व भाजीपाला पीकाला हवामान पोषक राहिले आहे. या वर्षी मागील हंगामाच्या तुलनेत लागवडीचे १० ते १२ टक्के क्षेत्र वाढ झाली आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादनाला चालू वर्षी दर चांगला राहिल्याने शेतकरी समाधानी आहे, अशी माहिती तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांनी दिली.



## बदलते तंत्रज्ञान

# तुम्ही विचार कराल, तेच टाईप होईल

मेटा बऱ्याच काळापासून ब्रेन-कॉम्प्युटर इंटरफेस (बीसीआय) वर काम करत आहे. संशोधनानुसार, सुमारे ८० टक्के अचूकता वाचून मेंदूच्या सिग्नलचे मजकुरात रूपांतर होऊ शकते. एमआयटी टेक्नॉलॉजी रिव्ह्यूच्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ब्लॉगनुसार, हे तंत्रज्ञान मॅग्नेटोएन्सेफलोग्राफी (एमईजी) मशीन नावाच्या विशेष ब्रेन स्कॅनरवर अवलंबून आहे, जे मेंदूच्या ॲक्टिव्हिटीमुळे तयार होणारे लहान चुंबकीय सिग्नल शोधते. याविषयी विस्ताराने जाणून घेऊया.




तुम्ही जो विचार केला तो टाईप होईल, असं तंत्रज्ञान आलं आहे. हो. हे सत्य आहे. तुम्ही फक्त विचार करायचा तुमचा विचार आपोआप टाईप होईल. मेटाने नुकताच ब्रेन-टायपिंग टेक्नॉलॉजीचा डेमो दिला, ज्यामुळे केवळ मनाने विचार करून मजकूर टायपिंग करता येतो.

हे एक नॉन-इनव्हेसिव्ह तंत्र आहे जे न्यूरल सिग्नल वाचते आणि त्यांना मजकुरात रूपांतरित करते. हे लवकरच उत्पादनात दिसण्याची शक्यता नाही. हार्डवेअरमर्यादा, डेटा गोपनीयता, नैतिक प्रश्न आणि कायदेशीर अडथळे हे बाजारपेठेसाठी तयार तंत्रज्ञान बनण्यापासून रोखतात. खरं तर २०१७ मध्ये फेसबुक, जे आता मेटा आहे, त्याने हे इनोव्हेशन प्रत्यक्षात आणण्याचा विचार केला. या यंत्रणेला काम करण्यासाठी अत्यंत महागड्या मशिन्सची आवश्यकता असते. आम्ही या तंत्रज्ञानाविषयी तुम्हाला सविस्तर समजावून सांगत आहोत.

अलीकडेच त्यांनी नॉन-इनव्हेसिव्ह ब्रेन-टायपिंग सिस्टमचा डेमो दाखवला, ज्यात ईईजी (इलेक्ट्रोएन्सेफलोग्राफी) आणि एआय मॉडेल्स चा वापर केला गेला. सध्याची ईईजी उपकरणे मोठी आणि महाग आहेत. हे लहान, अचूक आणि किफायतशीर होण्यास वेळ लागू शकतो. त्याचबरोबर प्रत्येक व्यक्तीच्या मेंदूची पद्धत वेगवेगळी असते, ज्यामुळे प्रत्येकासाठी सार्वत्रिक व्यवस्था निर्माण करणे अवघड जाते.


मेंदूसह डेटा ॲक्सेस करणे ही एक संवेदनशील बाब आहे. एखादी कंपनी तुमचे विचार साठवून ठेवेल का? त्याच वेळी, मेंदूच्या डेटासाठी कोणतीही कायदेशीर चौकट नाही आणि हे तंत्रज्ञान अनेक नैतिक वादविवाद निर्माण करू शकते.

मेटा ब्रेन टायपिंग हे एक रोमांचक तंत्रज्ञान आहे, परंतु ते सध्या सर्वसामान्यांसाठी उपलब्ध होणार नाही.

# लेखक, दिग्दर्शक प्रा. लक्ष्मण देशपांडे

डॉ. लक्ष्मण देशपांडे एक बहुरंगी मराठी लेखक, नाट्यदिग्दर्शक व अभिनेते होते. त्यांचा जन्म ५ डिसेंबर १९४३ रोजी झाला. ते लहानपणी गणपती उत्सवात होणाऱ्या मेळा नावाच्या करमणुकीच्या कार्यक्रमांत भाग घेत. तेथेच त्यांच्यातील कलावंताची जडणघडण झाली.

घरची परिस्थिती प्रतिकूल असूनही लक्ष्मण देशपांडे यांनी एमए व त्यानंतर एमडी (मास्टर इन ड्रॅमॅटिक्स)चे शिक्षण घेतले. मौलाना आझाद, सरस्वती भुवन महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम केल्यावर १९८०मध्ये ते औरंगाबाद विद्यापीठात शाखाप्रमुख म्हणून कार्यरत झाले. याचदरम्यान त्यांनी 'वऱ्हाड निघालंय लंडनला'ची निर्मिती केली. या नाटकाने अनेक विक्रम प्रस्थापित केले. हजारोंच्या संख्येने लोक प्रयोगांना हजर राहात. अमेरिका, इंग्लंड, कॅनडा, मस्कत, ऑस्ट्रेलिया, कतार, कुवेत, सिंगापूर, थायलंड, नायजेरिया येथेही वऱ्हाडचे प्रयोग झाले.



**निमित्त**

एकाच व्यक्तीने ५२ व्यक्तिरेखा साकारण्याचा विक्रम केल्याबद्दल त्यांची २००४मध्ये गिनीज बुकातही नोंद झाली. या नाटकाचा पहिला प्रयोग त्यांनी १९७९मध्ये केला होता. तेव्हापासून या नाटकाचे १,९६०पेक्षा अधिक प्रयोग सादर करण्याचा विश्वविक्रम त्यांच्या नावावर आहे. या तीन तासांच्या एकपात्री प्रयोगात ते ५२ रूपे सादर करायचे. त्यामुळे लोक त्यांना वऱ्हाडकर म्हणायचे. त्यांनी वऱ्हाड निघालंय लंडनला या नाटकाचे पुस्तक प्रकाशित केले. त्याच्या दोन आवृत्त्या निघाल्या. 'प्रतिकार' हे त्यांनी लिहिलेल्या एकांकिकांचे पुस्तकही रसिकांना भावले. 'मौलाना आझाद-पुनर्मूल्यांकन' या पुस्तकाचे तसेच महाराष्ट्र शासनातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या अक्षरनाद या पुस्तकाचे संपादन त्यांनी केले.

'रेशमगाठी', 'पैंजण' या मराठी चित्रपटांतही त्यांनी काम केले. याशिवाय त्यांनी द्विपात्री 'नटसम्राट' या नाटकातही काम केले. २०००मध्ये त्यांनी औरंगाबाद विद्यापीठातून स्वेच्छानिवृत्ती घेतली. त्याच वर्षी त्यांची परभणी येथे झालेल्या अखिल भारतीय नाट्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाली. अशा या महान लेखकाचे २२ फेब्रुवारी २००९ रोजी निधन झाले.

प्रा. लक्ष्मण देशपांडे यांना मिळालेले काही पुरस्कार असे आहेत २००३ : महाराष्ट्र शासनाचा कलावंत पुरस्कार, २००४ : विष्णूदास भावे पुरस्कार. याशिवाय छत्रपती शाहू महाराज, बेंडे स्मृती, राम श्रीधर, अल्फा टीव्ही, पुरुषोत्तम करंडक, वसंतराव नाईक कृषी संशोधन प्रतिष्ठान, सयाजीराव महाराज यांच्या नावाचे पुरस्कार. अखिल भारतीय नाट्य परिषदेतर्फे साहित्यसम्राट आचार्य अत्रे पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. चित्रपट किंवा नाट्यक्षेत्रात स्थिर होताना पुणे आणि मुंबई येथून कामाची पावती मिळाली तरच या क्षेत्रात प्रभाव पडतो हा समज त्यांनी खोडून काढला. उच्च शिक्षण घेतल्यानंतर आपल्या प्रतिभेच्या जोरावर त्यांनी लेखन आणि दिग्दर्शन क्षेत्रात नावलौकिक मिळवला. त्यांना स्मृदिनरानिमित्त विनम्र अभिवादन! **(साभार : इंटरनेट)**


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# शरीरातील कॅल्शियमची पातळी वाढवण्याचे उपाय घ्या जाणून

कॅल्शियम हे शरीरासाठी अत्यंत महत्वाचे पोषक तत्व आहे. आपल्या हाडांचे आणि दातांचे आरोग्य चांगले राखण्यात ते महत्त्वाची भूमिका बजावते. शिवाय हृदय आणि शरीराच्या स्नायूंसाठीही कॅल्शियम आवश्यक असते.




कॅल्शियम शरीरात रक्ताच्या गुठळ्या तयार होऊ देत नाही. त्यामुळे निरोगी आरोग्यासाठी शरीरात कॅल्शियमची खूप आवश्यकता असते. कॅल्शियमच्या कमतरतेमुळे स्नायू, हाडे आणि दातांवर तसेच मानसिक आरोग्यावर अनेक परीणाम होऊ शकतात. कॅल्शियमच्या कमतरतेमुळे रक्तदाब, स्नायू आणि सांधे कडक होणे, दातदुखी, त्वचा कोरडी होणे, नखे कमजोर होणे, तुटणे अशा अनेक समस्या उद्भवू शकतात. शरीरात कॅल्शियमच्या कमतरतेमुळे हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकचा धोकाही मोठ्या प्रमाणात वाढू शकतो. कॅल्शियमची कमतरता भरून काढण्यासाठी आहारात दूध, दही, पनीर आणि हिरव्या भाज्यांचे प्रमाण वाढवावे लागेल.

कॅल्शियमचे सर्वात मोठा स्त्रोत म्हणजे दूध आणि दुग्धजन्य पदार्थ आहेत. पण काही लोकांना दुधाची ॲलर्जी असते. अनेकांना ते आवडत नाहीत. अशा परिस्थितीत, आम्ही तुम्हाला काही असे खाद्यपदार्थ सांगणार आहोत ज्यामुळे कॅल्शियमची कमतरता दूर करता येऊ शकते.

जर तुम्हाला कॅल्शियम नसलेल्या दुग्धजन्य पदार्थांचे सेवन करायचे असेल तर तुम्ही तुमच्या आहारात नट्सचा समावेश करू शकता. हे कॅल्शियमचे चांगले स्त्रोत आहेत. बदाम सर्वाधिक कॅल्शियम देतात. अनेक वैद्यकीय जर्नल्स सांगतात की, एक कप बदामामध्ये सुमारे २८५ मिलीग्राम कॅल्शियम असतात. यामध्ये फायबर आणि हेल्दी फॅट्स देखील भरपूर असतात. बदाम हे मॅग्नेशियम, मॅंगनीज आणि व्हिटॅमिन ई चाही चांगला स्रोत आहे. हिरव्या पालेभाज्या हा एक कॅल्शियमचा उत्तम स्त्रोत आहे. हिरव्या भाज्या खाल्याने शरीरातील कॅल्शियमचे प्रमाण २१ टक्क्यांनी वाढू शकते. या भाज्या कॅल्शियम चांगल्या प्रकारे शोषून घेण्यास मदत करतात. शिवाय त्या आपल्या हाडांसाठी आणि दातांसाठी खूप फायदेशीर मानल्या जातात. व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन के, व्हिटॅमिन ई, व्हिटॅमिन सी, बीटा-कॅरोटीन अशी अनेक तत्व या भाज्यांमध्ये असतात. बीन्स आणि कडधान्ये अतिशय पौष्टिक असतात. त्यामध्ये फायबर, कॅल्शियम, प्रोटीन, मॅग्नेशियम, फोलेट, झिंक आणि पोटॅशियम भरपूर प्रमाणात असते. त्यामध्ये आढळणारे पोषक तत्व पचनक्रिया सुधारतात आणि आपली ऊर्जा पातळी देखील वाढवतात.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निराकरण होईपर्यंत काम बंदच ठेवा

## उच्चदाब विद्युत वाहिनीविरोधात पेण, रोह्यातील शेतकरी आक्रमक

**पेण : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या भरपाई संदर्भात अथवा निराकरण होत नाही तोपर्यंत उच्च विद्युत वाहिनीचे काम बंदच ठेवा, असा इशारा भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, शिवसेना युवा जिल्हाप्रमुख संजय म्हात्रे व शेतकऱ्यांनी प्रांत कार्यालयात झालेल्या बैठकीत अधिकारीवर्गाला दिला



पेण, रोहा तालुक्यातील गावांमध्ये उच्च विद्युत वाहिनीचे टॉवर उभारण्याच्या काम सुरू असून या विद्युत लाईनमुळे शेतकऱ्यांच्या जमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. या भागातील शेतकऱ्यांनी लढा सुरू केला असून या संदर्भात शुक्रवारी (दि. २१) प्रांताधिकारी प्रवीण पवार यांच्या अध्यक्षतेखाली शेतकऱ्यांच्यासोबत अधिकारीवर्गाच्य बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील शिवसेना युवासेना जिल्हाप्रमुख संजय म्हात्रे, महापारेषणचे अधिकारी, जेएसडबल्यू कंपनीचे अधिकारी व बाधित शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी युवानेते वैकुंठ पाटील आणि संजय म्हात्रे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना विश्वासात न घेता उच्चदाब विद्युत वाहिनीचे जे काम सुरू आहे ते प्रथम थांबवावे. प्रथमता शेतकऱ्यांशी चर्चा व्हायला पाहिजे होती. जमिनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार असून यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी.

या वेळी अधिकारीवर्गाने शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नासंदर्भात समर्पक उत्तरे न दिल्यामुळे शेतकऱ्यांनी या बैठकीत संताप व्यक्त केला व जोपर्यंत प्रशासन आम्हाला नुकसानभरपाई देत नाही तोपर्यंत आमच्या जमिनीत आम्ही महापारेषणला काम करू देणार नाही, असा निर्वाणीचा इशारा देण्यात आला

युवा नेते वैकुंठ पाटील यांनी महापारेषण कंपनी किंवा ठेकेदार यांनी शेतकऱ्यांच्या जागेत जबरदस्तीने काम सुरू केले असून या संदर्भात नोटीस अथवा माहिती देणे गरजेचे होते, पण असे काही झाले नाही. यामुळे योग्य तो निर्णय होत नाही तोपर्यंत काम बंद ठेवा अशी मागणी आम्ही केली आहे.

युवा नेते संजय म्हात्रे यांनी सांगितले की, महापारेषण कंपनीचे अधिकारी दंडेशाही पद्धतीने शेतकऱ्यांच्या जमिनीत टॉवरचे काम सुरू केले असून याबाबत आम्ही शासनाकडे पत्रव्यवहार केला, मात्र प्रशासन, अधिकारीवर्गाने बघ्याच भूमिका घेतल्याने आम्ही जिल्हाधिकारी तसेच येथील नेते आमदार महेंद्र दळवी, आमदार रविशेठ पाटील यांच्या माध्यमातून या कामासंदर्भात शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय व्हावा यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, पण या बैठकीत सक्षम अधिकारी उपस्थित नसल्याने बैठकीस आलेल्या अधिकारीवर्गाने कोणतीही ठोस आश्वासन दिले नसल्या कारणाने आम्ही यापुढेही उच्च विद्युत वाहिनी विरोधात लढा सुरूच ठेवणार असे त्यांनी सांगितले.




## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२–२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२–२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२– २७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२– २७४५२३३९
ई–मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

### अधिसूचना

पिटीशन फॉर लिव्ह टू सिव्हील अपिल क्र.८५१९/२००६ चे प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने धार्मिक स्थळांचे बांधकाम निष्कासित करणे / नियमित करणे/ स्थलांतरित करणे या अनुषंगाने निर्देश तसेच महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. सीटीएम–०९०९/प्र.क्र. ५५८/ (भाग२)/ विशा– १ ब, दि. ०५ मे २०११ चे अनुषंगाने, मी, प्रशासक तथा आयुक्त, जी अधिसूचना काढण्याचे योजित आहेत, त्या अधिसूचनेचा खालील मसुदा सर्व नागरिकांच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

### अधिसूचनेचा मसुदा

पनवेल महानगरपालिका हद्दीत सिडको प्राधिकरणा अंतर्गत खारघर नोड मधील कार्पोरेट पार्क, सेक्टर २९, भूखंड क्र. NA१ याठिकाणी श्री. स्वयंभू गणेश मंदिर विटांचे बांधकाम व पत्राशेडचे अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम / धार्मिक स्थळ म्हणून नमूद असलेल्या विभागातील अनधिकृत धार्मिक स्थळांचे वर्गिकृत यादी त्याचे वर्गीकरणानुसार पुढील कार्यवाही अनुषगांने प्रसिद्ध करण्यात येत आहे. 'अ' वर्गिकरणातील नियमितीकरणास प्रस्तावित असलेली, 'ब' वर्गीकरण असलेले नियमितीकरण करणे शक्य नसलेली व 'क' वर्गीकरण असलेले स्थलांतरण करणे प्राप्त असलेली धामिक स्थळे असून, त्याबाबत वर्गीकरण निहाय नियमितीकरण, निष्कासन व स्थलांतरणाची कारवाई प्रस्तावित करणेत येत आहे. अशा वर्गीकरणाबाबत कोणाला काही आक्षेप किंवा हरकत असल्यास ते त्यांनी उक्त अधिसूचना प्रसिध्द झाले **दिनांकपासून पुढील ३० दिवसाच्या** कालावधीमध्ये पनवेल महानगरपालिका स्तरीय समीतीकडे पनवेल महानगरपालिका कार्यालय येथे पुरावे / कागदपत्र यांसह सादर करावेत. तदनंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेप / हरकती याबाबत विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**मंगेश पांडूरंग चितळे**
**पनवेल महानगरपालिका**
**स्तरीय अनधिकृत धार्मिक स्थळे समिती**

**जा.क्र :–पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र.७७/७७/२०२५**
**दिनांक :– २१/२/२०२५**


## हिरानंदानी सिटीत सांडपाण्यावर प्रक्रिया करून पर्यावरणपूरक वापर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील भोकरपाडा येथील हिरानंदानी फॉर्चुन सीटी या गृह प्रकल्पामधील सदनीकाधारकांनी वापर केलेले सांडपाणी ही वापरात यावे यासाठी एसटीपी प्लॅन्ट बसवून सांडपाण्यावर प्रक्रिया करत असल्याचे दिसून येते.



प्रकिया केलेले सांडपाणी सदनिकामध्ये टॉयलेट फ्लशिंगसाठी तसेच वसाहतीतील सूंदर वेगवेगल्या जातींच्या झाडांची लागवड तसेच हिरवे गार मैदान व फुलझाडे तसेच परिसरातील रस्त्यावर वाटर टँकरद्वारे धुळ प्रदुशन होऊ नये यासाठी परिसरात हे पाणी वापरून हिरानंदानी वसाहत परिसर हा हिरवागार पर्यावरण पुरक सुंदर करताना दिसत आहे. भोकरपाडा हिरानंदानी वसाहतीतील काही सेक्टर पुर्ण होऊन त्या सेक्टर मध्ये नागरिक वास्तव्यास येऊन आपला ऊदरनिर्वाह करत असून घरगुती वापर करत असलेले सांडपाणी वसाहतीमध्ये बनविलेल्या एसटीपी प्लॅन्टमध्ये जावून त्यावर प्रक्रिया करत दरमहा या पाण्याची लॅबोरेटरी फॉर टेस्टींग ऑफ वॉटर,फुड,सॉईल,सीओडी, बीओडी तपासणी करण्यात येत आहे.

हिरानंदानी वसाहतीतील सांडपाण्यावर एसटीपी प्लॅन्टमधून प्रक्रिया करत या पाण्याच्या वापर करताना दिसत आहेत.हिरानंदानी वसाहत कायमची परिसर सुबक, हरित तसेच पर्यावरण पुरक प्रदुषण मुक्त करण्याचा प्रयत्न असून तसा संकल्प फॅसिलिटी मॅनेजर ओंकार वडके यांनी केला आहे.

## 'बिर्ला कार्बन इंडिया'कडून शिवजयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

**मोहोपाडा, चौक : प्रतिनिधी**

पाताळगंगा येथील बिर्ला कार्बन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड पाताळगंगातर्फे दिनांक १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ या जयंतीनिमित्त कंपनीच्या सामाजिक बांधिलकी उपक्रम अंतर्गत एमजीएम हॉस्पिटल नवी मुंबई यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सदर शिबिराचे उद्घाटन बिर्ला कार्बन कंपनीचे युनिट हेड रवींद्र रघुवंशी यांनी केले. कंपनीचे मानव संसाधन विभाग प्रमुख निखिल भामरे यांनी शिवाजी महाराजांच्या कार्याविषयी शिवप्रेमींना मार्गदर्शन केले व छत्रपती शिवाजी महाराज उत्कृष्ट प्रशासक होते हे पटवून दिले.

कंपनीच्या सभोवतालच्या गावातील शिवप्रेमींनी उत्कृष्टपणे सहभाग नोंदवला २०९ रक्तदात्यांनी रक्तदान करून महाराजांची जयंती साजरी केली.





## महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

### निविदा सूचना क्रमांक ९५ सन २०२४-२०२५

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता. महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५–२२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी–१ नमुन्यातील निविदा मार्गावत आहेत. को–या निविदा नमुना **दिनांक २४/०२/२०२५ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक ०३/०३/२०२५ रोजी १८.०० वाजे पर्यंत** www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व दिनांक ०४/०३/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो दिनांक ०४/०३/२०२५ रोजी ११.०० वाजता उघडतील. निविद्या उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहानं आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई–निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिते बैठक हॉल येथे रस्त्याचे बांधकाम करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. | ९६४६१९ | १०००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | उपजिल्हा रूग्णालयण माणगांव येथे जनरेटर रूमसाठी पत्राशेड बांधणे व रूग्णालयातील विविध कक्षांचे कायाकल्प कार्याक्रम अंतर्गत नूतनीकरण करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ९९८७७५ | १०००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | मौजे कुर्ले गायकरवाडवाडी येथे रस्ता तयार करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. | ८१३१९३ | ९००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | भोगाव बौध्दावाडी ग्रा.पं. शेल ता. महाड येथे सामाजिक सभागृह बांधणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. | ८४३४२६ | ९००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | म्हासाडी कोरखंडे किस्तेकेतकी नीगुडशेत आणि रा.मा ९७ ते मेढे रा.मा ९१ प्राजिमा ८१ मध्ये कि.मी १५/१०० मध्ये सुधारणा करणे. तालुका तळा, जिल्हा रायगड. | ८३९७३५ | ९००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | मौजे रात्तवड येथील श्री प्राविनचंद्रा पालकर हाउस ते पंप हाउस पर्यंत रस्त्याचे बांधकाम करणे. तालुका तळा, जिल्हा रायगड, | ८२६४३६ | ९००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | तालुका फळरोपवाटीका किल्ला येथे मजुर अंक निवासस्थान दुरूस्त करणे, तालुका रोहा, जिल्हा रायगड. | ७२०३२९ | ८००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ८ | तुडील भेलोशी मंडणगड रस्ता प्रजिमा ६६ कि.मी. ०/०० ते ६/०० मध्ये सुरक्षात्मक उपाय योजना करणे तालुका महाड, जिल्हा रायगड. | ६९१६१५ | ७००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ९ | श्रीवर्धन येथील जुने तहसिल कार्यालय इमारत डिमॉलिश करणे, तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड. | ३७६१७५ | ४००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| १० | माणगांव येथील मा. जिल्हा न्यायाधीश निवासस्थानामध्ये स्नानगृह व स्वच्छतागृहाचे दरवाजे बसविणे व इतर दुरूस्ती करणे, तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | २५२५०१ | ३००० | ५९०/– | ३ महिने | वर्ग नऊ व वरील |
| ११ | माणगांव येथील न्यायालय इमारतीमध्ये नवीन एच.डी.पी. पाण्याची टाकी व पाईप जोडणी बसविणे ता. माणगांव, जिल्हा रायगड | ६२७६२ | १००० | ५९०/– | १ महिने | वर्ग आठ व वरील |

**टिप :–** १) तपशिलवार निविदा सुचना https://mahapwd.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील.

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/६८५**
**दिनांक : २०/०२/२०२५**

**विमाका/ कोवि/२०२४–२०२५/३४८**


## मध्य रेल्वेची ओपन ॲक्सेस पॉवर खरेदीमुळे ६००५ कोटी रुपयांची बचत

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने आपल्या वीज गरजांसाठी हरित ऊर्जेचा वापर वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.भारतीय रेल्वेवर ओपन ॲक्सेस पद्धतीने वीज खरेदी करण्याची संकल्पना सुरू केल्याने ६००५ कोटी रुपयांची बचत झाली

पूर्वी भारतीय रेल्वे राज्य वीज मंडळे किंवा वितरण कंपन्या (डिस्कॉम्स) कडून जास्त दराने वीज आवश्यकता पूर्ण करत असे. कालांतराने खर्च कमी करण्यासाठी अनेक धोरणे अवलंबली आहेत. याचा एक मोठा भाग खुल्या प्रवेशाचा होता, ज्यामुळे वीज एक्सचेंज, जनरेटर किंवा द्विपक्षीय करार यासारख्या स्वस्त स्त्रोतांकडून थेट वीज खरेदी करता येते ज्यामुळे खर्च कमी होतो.

मध्य रेल्वे हा २०१५ मध्ये ओपन ॲक्सेसद्वारे वीज खरेदी करणारा भारतीय रेल्वेचा पहिला विभाग होता आणि २०१५–१६ पासून आजपर्यंत एकूण ६००५.४२ कोटी रुपयांची बचत झाली आहे. २०१५–१६ मध्ये १६१.२० कोटी रुपयांची बचत झाली होती, जी २०२४–२५ मध्ये ६९०.४७ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली. ओपन ॲक्सेस अंतर्गत प्रत्यक्ष वीज खरेदी खर्चाची तुलना प्रति किलोवॅट तास (केडब्ल्यूएच) रु. ८.६९ च्या पूर्वीच्या खरेदी खर्चाशी करून ही बचत साध्य करण्यात आली आहे.


### नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH46/CC/AUTO/2019/4319 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH-46-BD7115 चे मालक **गणेश रघुनाथ पारधी** यांचे तारीख २५/०७/२०२४ रोजी निधन झालेले आहे.

मी गीता गणेश पारधी, रा. सांगुर्ली, शिरढोण ता. पनवेल, जि. रायगड महाराष्ट्र ४१०२२१ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – गीता गणेश पारधी**
**पत्ता– रा. सांगुर्ली, शिरढोण ता. पनवेल, जि. रायगड ४१०२२१**


## खालापूर बीडीओ संदीप कराड यांची 'माझी वसुंधरा'साठी निवड

**चौक : प्रतिनिधी**

माझी वसुंधरा अभियान ६.०चे टूलकिट तयार करण्या करिता खालापूर गटविकास अधिकारी (प्रथम श्रेणी) संदीप कराड यांची कोकण विभागातून निवड करण्यात आली आहे.

माझी वसुंधरा अभियान ५.० हे ३१ मार्च २०२५ रोजी संपत असून माझी वसुंधरा अभियान ६.० हे १ एप्रिल २०२५ रोजी सुरू होत आहे. माझी वसुंधरा अभियान संचनालय सर्व स्थानिक स्वराज्य संस्था करिता लागू होताना व्यवहार्य असणारी व अंमलबजावणी करण्यास योग्य या उद्देशा करिता अधिकारी,कर्मचारी, तज्ञ यांचे मत जाणून घेण्यासाठी एक समिती गठित करण्यात आली आहे. कोकण विभागात उत्कृष्ट काम करणारे गटविकास अधिकारी म्हणून खालापूरचे गटविकास अधिकारी संदीप कराड यांची निवड करण्यात आली आहे.



माझी वसुंधरा अभियान १.० पासुन संदीप कराड सक्रिय असून राज्य स्थरावर त्यांनी उत्कृष्ट काम केले आहे. तसेच पंचायत समिती व त्या अंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायत यांना पारितोषिक मिळउन देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. खालापूर तालुक्यातील ग्राम पंचायत तांबाटी, वडगाव, साजगाव यांनी पारितोषिक जिंकले आहे.

गटविकास अधिकारी संदीप कराड तसेच कोकण विभाग स्थरावर उत्कृष काम करणारे ग्रामपंचायत अधिकारी म्हणून तांबाटी ग्राम पंचायतचे अधिकारी प्रशांत कदम यांची निवड करण्यात आली आहे. एकाच तालुक्यातून दोन अधिकारी यांची निवड झाल्याने माझी वसुंधरा अभियान ६.० पुन्हा यशस्वी होईल


### जाहिर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मुळ जमीन मालक श्रीमती. मुक्ताबाई पांडूरंग पाटील आणि श्री. चंद्रशेखर पांडूरंग पाटील, राहणार बेलपाडा गाव, ता. पनवेल, जि. रायगड., यांच्या मालकी हक्क, ताबे कब्जा व वहीवाटीतील **मौजे जासई, ता. उरण, जि. रायगड** येथील भुधारणा पध्दती भोगवटादार वर्ग २ खाली नमुद करण्यात आलेली जमिन मिळकत – कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन येणेप्रमाणे –

**–: मिळकतीचे वर्णन :–**

| भुमापन क. /उपविभाग क. | क्षेत्रफळ (हे. आर. चौ. मी.) | | | आकार |
|---|---|---|---|---|
| | जिरायत | लागवडीस अयोग्य | एकूण क्षेत्र | रु. पैसे |
| ४३/८/ब | ० - ०८ - १० | ० - ०० - ५० | ० - ०८ - ६० | १.१९ |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वरील मिळकती संदर्भातील साठेकरार/ खरेदीखत हे आमचे अशिल आणि मुळ जमिन मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे त्यापुर्वी सदरची मिळकत ही निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या मिळकतीवर अथवा त्याच्या भागावर विकी, गहाणवट, भेट अन्य कोणत्याही प्रकारे कोणाचाही हक्क, हितसंबध, दावा असेल तर त्यांच्या पृष्टयार्थ त्यांनी अशा हक्काबाबत/हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क / हरकतीचे स्वरुप यांची माहिती अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणा–याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **पंधरा (१५) दिवसांच्या आत** सादर करावी, आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदर मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता माझे अशिल हे सदरहु जमिन मिळकत ही कायमस्वरुपी खरेदी करण्याच्या दृष्टिने पुढील कार्यवाही करतील याची नोदं घ्यावी.

**सही/–**
**धनंदा प्रदिप मोकल**
**(वकील उच्च न्यायालय)**
**पत्ताः शॉप नं. १४, शिव चेंबरर्स, प्लॉट नं. २१, सेक्टर–११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे मो. नं. ९६१९५०५९५८**

## निवडक

### आचार्य जांभेकरांना अभिवादन

**नवी मुंबई :** मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महापालिकेच्या वतीने महापालिका मुख्यालयात ॲम्फिथिएटर येथे बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करीत अभिवादन करण्यात आले. या वेळी शहर अभियंता शिरीष आरदवाड, सहा.संचालक नगररचना सोमनाथ केकाण, उपायुक्त किसनराव पलांडे व सोमनाथ पोटरे, कार्यकारी अभियंता राजेश पवार तसेच विविध वृत्तपत्रे व वृत्तचित्र वाहिन्यांचे प्रतिनिधी आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### सीबीडीत शिवजयंती साजरी



**नवी मुंबई :** शिव छत्रपती प्रतिष्ठान व नवी मुंबई रिक्षा चालक मालक वेल्फेअर असोसिएशन च्या माध्यमातून शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषमय वातावरणात सिबिडीत साजरी करण्यात आली. आपोलो हॉस्पिटलच्या माध्यमातून मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शबिराचा असंख्य लोकांनी लाभ घेतला. लहान मुलांच्या चित्रकला स्पर्धा व विविध क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. सायंकाळी शिव जल्लोष या गाण्यांच्या कार्यक्रमाचे आयोजन होते तसेच स्नेहभोजनसुद्धा झाल्याचे आयोजक भाजप युवा नेते सुभाष गायकवाड यांनी सांगितले.

### युईएस कॉलेजमध्ये शिवजयंती



**उरण :** युईएस स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स ॲण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने विमला तलाव येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याजवळ विद्यार्थी पारंपरिक वेषभूषेत जमले होते. संस्थेच्या ट्रस्टी मेंबर्सनी शिवरायांच्या मूर्तीस पुष्पहार घातले. त्यानंतर पालखीतील शिवरायांच्या मूर्तीसही पुष्पहार घालून अभिवादन केले. त्यांच्यासोबत सिनियर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्य, स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्य, विभाग प्रमुख, पर्यवेक्षिका, समन्वयक, पीटीए सदस्य, पालकगण, शिक्षकगण, विदयार्थी उपस्थित होते.

### पनवेलमधून रिक्षाची चोरी

**पनवेल :** शहरातील उपजिल्हा रुग्णालयाच्या पाठीमागील गेटजवळ असलेल्या मेडिसिटी मेडीकलसमोर उभी करून ठेवलेली रिक्षा अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे. प्रभाकर पाटील यांनी त्यांची ७० हजार रुपये किंमतीची बजाज कंपनीची ऑटो रिक्षा (एमएच-०६-बीव्ही-३७६२) काळ्या पिवळ्या रंगाची रिक्षा तिथे उभी ठेवली होती. चोरीची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** शहर परिसरात एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे, उंची साडेपाच फुट असून डोक्याचे केस काळे पांढरे, चेहऱ्यावर खुरटी दाढी वाढलेली तसेच अंगात हाफबाह्याचे लाल टीशर्ट व निळसर जिन्स पॅन्ट घातलेली आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (८५९१४२४३५०) किंवा पो.उपनिरीक्षक संजय अस्पतराव यांच्याशी संपर्क साधावा.

# अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई

## नवी मुंबई महापालिकेची नेरूळमध्ये मोहीम



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली नेरूळ विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नेरूळ विभागाअंतर्गत बांचोली मैदानाजवळ, नेरूळ, सेक्टर-२०, येथे फुटपाथवरील टपरीचा अनधिकृतरित्या चायनीज खाद्यपदार्थ विक्रीसाठी वापर होत असल्याचे निदर्शनास आल्याने सदर टपरी निष्कासित करण्यात येऊन सामान जप्त करण्यात आले आहे.

शॉप नं १० व १२, भुखंड क्र.१७, से. ८, नेरूळ, ठिकाणी प्रत्यक्ष पहाणी केली असता अंदाजे पुढील भागात सरासरी १७.५ द ४.७५ मोजमापाचे मार्जिनल स्पेस व मागील भागात ७.८० द ७.४५ मोजमापाचे किचन पत्राशेड तसेच पहिल्या मजल्यावर ६.० द १.५० मोजमापाचे ओपन बाल्कनी बंदिस्त करून अनधिकृतरित्या वाणिज्य वापर करीत असल्याचे निदर्शनास आल्याने सदर अनधिकृत बांधकामधारकाला अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी नेरुळ विभाग कार्यालयाकडून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५४ अन्वये ५ फेब्रुवारी रोजी नोटीस बजावण्यात आलेली होती.

नोटीसीची मुदत संपुष्टात येऊनही अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविण्यात आले नाही. ही कारवाई सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी जयंत जावडेकर, कनिष्ठ अभियंता संजय सोनटक्के व अतिक्रमण विभागातील कर्मचारी, १४ मजुर, २ गॅसकटरच्या सहाय्याने अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक समवेत सुरक्षारक्षक यांच्या मार्फत करण्यात आली आहे.

## नोकरीच्या बहाण्याने १९ लाखांची फसवणूक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील एका तरुणाची रेल्वेतील सरकारी नोकरी लावण्याच्या बहाण्याने तब्बल १९ लाख ४२ हजार रुपयांची फसवणूक झाली आहे.

पनवेल शहरातील वडाळे तलावाशेजारील नंदनवन कॉम्प्लेक्समध्ये राहणार्या ४० वर्षीय तरुणाने दिलेल्या तक्रारीनुसार पाच महिन्यांपूर्वी एका भामट्याने फोनवरुन संपर्क केला. सरकारी नोकरी मिळविण्यासाठी ऑफर लेटर दिल्यावर वेळीच उमेदवाराने कागदपत्र न दिल्यास हे ऑफरलेटर रद्द करण्याची भीती घातली. तसेच विविध कागदपत्रे बनविण्यासाठी पैसे उकळले. या कागदपत्रांमध्ये वैद्यकीय प्रमाणपत्र, प्राप्तीकराचा दाखला, कुटूंब सदस्यांबाबतचे शपथपत्र अशी कागदपत्रे मागितली. ही फसवणूक दोन भामट्यांनी मिळून केली. दोन भामट्यांनी बँकेच्या खात्यामधून फसवणुकीची रक्कम स्वीकारली आहे. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल आहे.

अलिकडच्या काळात विविध बहाणे सांगून फसवणूक करण्याच्या घटना वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## गव्हाण विद्यालयात शिवजयंती उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व जुनिअर कॉलेजमध्ये अतिशय उत्साहात साजरी करण्यात आली. हा कार्यक्रम इयत्ता सातवी क च्या वर्गातर्फे सादर करण्यात आला होता.

यावेळी वर्गाचे वर्गशिक्षक विशांत ठाकूर यांनी नियोजन केले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक जी.सी. गोडगे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर आर.एस.भोईर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवण्यात आले. यावेळी कार्यक्रमास सर्व रयत सेवकांनी अगदी उत्साहाने उपस्थिती दाखवली.

ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख पाटोळे, गुरुकुल विभाग प्रमुख भोईर एस के त्याचप्रमाणे घरत एम के., चौधरी आर. एन., पाटील सी.एम., ठाकूर सी. एन.पाटील वाय एस. घरत एस एन.,कोळी जे एस, ठाकूर जे.ई., ी म्हात्रे व्ही. जी., पाटील पी एस वर्तक डी आर, गोंधळी यु.जी, करावकर पी जे, तसेच सर्व रयतसेवकांनी प्रतिमा पूजन केले. यावेळी शिक्षक पालक संघाचे अध्यक्ष कुंदन राम मोकल तसेच पालक राजश्री नाळे उपस्थित होते जुनियर कॉलेजचे यु डी पाटील,अर्चना पाटील,सागर रंधवे,खेडकर आर ए, ठाकूर महेश मात्रे तसेच विद्या पाटील आणि विद्यार्थी उपस्थित होते. सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील यांनी सूत्र संचालन केले विशांत ठाकूर यांनी आभार मानले.

## पनवेलमधील प्रशासकीय भवनाची पोलीस अधिकाऱ्यांकडून पाहणी

**पनवेल : वार्ताहर**

गेल्या कित्येक वर्षांपासून रेंगाळत असलेले प्रशासकीय भवन आता पूर्णत्वास येत असून आता लवकरच पनवेल शहर पोलीस ठाणे येथे स्थलांतरीत होण्याची चिन्हे आहेत. त्याअनुषंगाने प्रशासकीय भवनाची पोलीस अधिकाऱ्यांकडून पाहणी करण्यात आली.

पनवेल शहरात नव्याने उभारण्यात आलेल्या नव्या 'प्रशासकीय भवन' या इमारतीचे बांधकाम (न्यायालयीन प्रकरण जागा वगळून) पूर्ण झाले आहे. त्यामुळे इमारतीमधील पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावरील कार्यालयीन जागा तहसिल कार्यालय पनवेल यांच्याकडे अगोदरच हस्तांतरित करण्यात आली आहे. या इमारतीमध्ये तळमजल्यावर पनवेल शहर पोलीस ठाणेसाठी जागा आरक्षित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने या ठिकाणी पोलीस ठाणे अंतर्गत आवश्यक असणारे



विविध विभाग उभारण्यात आले आहे. या विभागाची आज परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते व वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी पाहणी केली. यावेळी त्यांना काही त्रुटी आढळून आल्या.

याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता निखिल गाडे यांना माहिती दिली व सूचना केल्या. सदर त्रुटी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत लवकर पूर्ण झाल्यावर येथे पनवेल शहर पोलीस ठाणे स्थलांतरित करण्यात येईल, अशी माहिती पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते यांनी यावेळी दिली.

## जलपरिषदेमध्ये नवी मुंबई मनपातर्फे होल्डिंग पाँडचे प्रभावी सादरीकरण

**नवी मुंबई : बातमीदार**

उदयपूर, राजस्थान येथे होत असलेल्या 'दुसरी अखिल भारतीय राज्य जल मंत्री परिषद २०२५ - भारत २०४७ : जलसुरक्षित देश' या राष्ट्रीय स्तरावरील परिषदेमध्ये नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांना 'किनारपट्टीवरील शहरातील शाश्वत आणि प्रभावी पाणीवापर : नवी मुंबई महानगरपालिकेचा तपशीलवार अभ्यास या विषयावर सादरीकरण करण्यासाठी विशेष निमंत्रित करण्यात आले होते.

या अनुषंगाने केंद्रीय जलशक्तीमंत्री आर.पाटील, देशभरातील विविध राज्यांचे जल मंत्री, केंद्रीय जल मंत्रालयाचे सचिव तसेच अन्य सचिव तसेच मान्यवर प्रतिनिधींसमोर नमुंमपा आयुक्त डॉ. शिंदे यांनी नवी मुंबईतील जलवितरणाची अत्यंत प्रभावी कार्यप्रणाली तसेच पूरपरिस्थिती उद्भवू नये याकरिता होणारा होल्डींग पाँडचा उपयोग याबाबत माहितीपूर्ण सादरीकरण केले. राष्ट्रीय स्तरावर सादरीकरणाचा बहुमान मिळणे नवी मुंबईचा गौरव आहे.




# नवी मुंबई महानगरपालिका तयार करणार टॉयलेट सेवा ॲप

## १०० दिवस कृती आराखड्याचा आढावा



**नवी मुंबई : बातमीदार**

मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतील १०० दिवसांच्या कृती आराखड्याबाबत आयुक्त कमालीचे आक्रमक झालेले पाहायला मिळत आहेत. हे उद्दिष्ट्य पूर्ण करण्यासाठी आयुक्त काटेकोर लक्ष देत आहेत. त्यानुसार

महापालिका क्षेत्रातील ४५० हून अधिक सार्वजनिक, सामुदायिक शौचालये आहेत. या शौचालयांमध्ये होणारे दैनंदिन स्वच्छता काम यावर नियमीत लक्ष ठेवण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग करुन 'टॉयलेट सेवा ॲप' सारखी आधुनिक यंत्रणा तयार करावी व त्यावर नियंत्रण राखण्याकडे दोन्ही परिमंडळांच्या उपायुक्तांनी बारकाईने लक्ष देण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. तुर्भे येथील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पस्थळी होणारी कार्यवाही अधिक प्रभावीपणे होण्याकडे व तेथील रेकॉर्ड अदययावत ठेवण्याकडे काटेकोर लक्ष देण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

शौचालयांच्या विदयमान स्थितीची पाहणी करण्याची जबाबदारी सर्व स्तरातील अभियंत्यांकडे दयावी व तीन दिवसात अहवाल घेऊन आवश्यक सुधारणा कामे तातडीने करावीत असे निर्देश आयुक्तांमार्फत अभियांत्रिकी विभागास देण्यात आले.स्वच्छ सर्वेक्षणाच्या अनुषंगाने स्वच्छताविषयक सर्वच बाबींवर अधिक बारकाईने काटेकोर लक्ष देण्याचे निर्देश देत नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी क्षेत्रीय स्तरावरील कर्मचाऱ्यांपासून मुख्यालय स्तरावरील विभागप्रमुखांपर्यंत सर्वांनी विभागांमध्ये प्रत्यक्ष जागांवर जाऊन पाहणी करावी व स्वच्छता सुधारणांवर भर दयावा असे सूचित केले. विभाग प्रमुखांच्या आढावा बैठकीप्रसंगी आयुक्तांनी स्वच्छता कार्याचा तसेच मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतील १०० दिवसांच्या कृती आराखडयाचा व न्यायालयीन प्रकरणांचा तपशीलवार आढावा घेत गांभीर्यपूर्वक कार्यवाहीचे निर्देश दिले. या वेळी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व डॉ.राहुल गेठे, शहर अभियंता शिरीष आरदवाड आणि सर्व विभागप्रमुख, विभाग अधिकारी, कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

नवी मुंबईच्या स्वच्छतेमध्ये पालिकेच्या अखत्यारित नसलेल्या महामार्गांवरील स्वच्छतेचा तसेच रेल्वे स्थानकांच्या स्वच्छतेचा महत्वाचा भाग आहे. यामध्ये रेल्वे स्टेशनवरील शौचालये व स्टेशन परिसराची स्वच्छता या अनुषंगाने सिडको महामंडळाच्या अधिकाऱ्यांनाही यावेळी आढावा बैठकीस पाचारण करण्यात आले होते. रेल्वे स्टेशनवरील स्वच्छतागृहांची स्थिती वापरण्यायोग्य व उत्तम असावी याकडे सिडकोमार्फत काटेकोर लक्ष दिले जावे असे यावेळी आयुक्तांनी निर्देशित केले. याबाबत महानगरपालिकेमार्फत सिडकोशी अनेकदा पत्रव्यवहार करण्यात आला असून त्याची तत्परतेने अंमलबजावणी करावी आणि तेथील शौचालयांमध्ये आवश्यक दुरुस्ती कामे करुन सुधारणा करावी व तेथे नियमित स्वच्छता राहील याची गांभीर्याने काळजी घ्यावी असे आयुक्तांमार्फत सिडको अधिकाऱ्यांना सूचित करण्यात आले. नागरिकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये हे आपले अंतिम उद्दिष्ट असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले.

त्यासोबतच स्टेशन परिसराची सखोल स्वच्छता करावी, त्याठिकाणी रंगरंगोटी व सुशोभिकरण करावे, त्या परिसरातील धूळ खात उभी असलेली बेवारस वाहने हटवावीत आणि त्याठिकाणची मलनि:स्सारण वाहिन्यांवरील तुटलेली झाकणे त्वरित बदलून घ्यावीत असेही आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले. ही कामे करुन घेण्याकडे महानगरपालिकेचे संबंधित विभाग अधिकारी व कार्यकारी अभियंता यांनी बारकाईने लक्ष देण्याच्या सूचना आयुक्तांनी यावेळी केल्या. याकामी सिडकोला काही मदत लागल्यास ही पालिकेमार्फत पुरविण्यात येईल असेही आयुक्तांनी यावेळी सांगितले. रेल्वे स्टेशन परिसरात अनधिकृत फेरीवाले बसू नयेत याबाबतही सिडकोने अधिक कृतीशील व्हावे व त्या कामी आवश्यकता भासल्यास महानगरपालिकेच्या तेथील विभाग कार्यालयांची मदत घ्यावी अशाही सूचना आयुक्तांनी केल्या. रेल्वे स्टेशन परिसरातील बसस्टॉपच्या ठिकाणी असलेले खड्डे त्वरित भरुन घेऊन सुधारणा करावी असेही निर्देशित करण्यात आले.

उदयाने सुस्थितीत राहण्याच्या दृष्टीनेही प्रमाण कार्यप्रणाली (ड्जझ) तयार करावी तसेच प तयार करावे जेणेकरुन उदयानामधील त्रुटी कळू शकतील व त्याचे निराकरण करणेही तत्परतेने शक्य होईल अशाही सूचना आयुक्तांनी केल्या. रस्त्यांमधील दुभाजक तसेच रस्त्यांकडेच्या मोकळ्या जागा यांचे सुशोभिकरण काम अभियांत्रिकी विभागामार्फत करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

शहरात स्वच्छतेप्रमाणेच सुशोभिकरणावरही भर देऊन नागरिकांना व प्रवाशांना सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करावीशी वाटणार नाही अशाप्रकारचे सुंदर वातावरण तयार करण्यासाठी रंगरंगोटी करावी, शिल्पाकृती सुस्थितीत कराव्यात, कारंजे सुरु राहतील याची काळजी घ्यावी असेही आयुक्तांमार्फत सूचित करण्यात आले.

कचऱ्याचे घरातूनच ओला, सुका, घरगुती घातक अशा तीन प्रकारे वर्गीकरण करणे अत्यंत आवश्यक असून याकरिता सर्व विभाग अधिकाऱ्यांनी आपल्या अधिनस्त अधिकारी, कर्मचारी यांच्या समवेत सोसायटयांना व वसाहतींना भेटी दयाव्यात, तेथील नागरिकांशी संवाद साधावा, त्यांना कचरा वर्गीकरणाचे महत्व पटवून दयावे व त्यांच्याकडून ते करवून घ्यावे असे आयुक्तांनी सूचित केले. अशाच प्रकारे महानगरपालिकेच्या व खाजगी शाळांमधील विदयार्थ्यांमध्ये कचरा वर्गीकरणाचे महत्व प्रसारित करावे व त्यांच्या पालकांकडून ते करवून घेण्यासाठी ठोस प्रयत्न करावेत असेही निर्देश आयुक्तांनी दिले.

स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत नागरिकांचे अभिप्राय घेण्यास स्वच्छ भारत मिशनमार्फत सुरुवात झालेली असून त्यामध्ये जास्तीत जास्त नवी मुंबईकर नागरिकांनी अभिप्राय नोंदवावेत यादृष्टीने नियोजन करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी असेही निर्देश आयुक्तांनी यावेळी दिले.

त्याचप्रमाणे मुख्यमंत्री महोदयांनी १०० दिवसांचा कृती आराखडा जाहीर केला असून त्यामधील सात कलमांनुसार नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्वच विभागांमध्ये कार्यवाहीला प्रारंभ झालेला आहे.

# मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाची अपूर्ण कामे प्राधान्याने पूर्ण करावीत

## ◆ सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे निर्देश

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी गुरुवारी (दि. २०) मुंबई-गोवा महामार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून कामाचा आढावा घेतला. महामार्गावरील सुरू असलेली कामे, त्यामध्ये होत असलेली दिरंगाई, जमीन हस्तांतरणात येत असलेल्या अडचणी तसेच अन्य सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात येतील. सर्व संबंधित यंत्रणांनी महामार्गाचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशा सूचना मंत्री भोसले यांनी या वेळी दिल्या.





मुंबई-गोवा महामार्गावरील अपूर्ण कामाची पाहणी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले रायगड आणि रत्नागिरी जिल्हा दौऱ्यावर आले होते. पनवेल येथील पळस्पे फाटा येथून या पाहणी दौऱ्यास सुरुवात झाली. हा महामार्ग एकूण १२ टप्प्यांत विकसित होत आहे. एकूण ४३९.८८ किमीपैकी पळस्पे फाटा (पनवेल) ते हातखांबा (रत्नागिरी) या २८१ किलोमीटरच्या पल्ल्यावरील कामाची पाहणी करण्याचे दौऱ्यात नियोजित होते. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडून त्यांनी या टप्प्यातील कामांची सद्यस्थिती, त्यासाठी आवश्यक बाबी यांची माहिती घेतली. ही कामे सार्वजनिक बांधकाम आणि महामार्ग प्राधिकरण या विभागांतील अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वय साधून लवकरात लवकर पूर्ण करावीत, अशा सूचना मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिल्या.

या पाहणी दौऱ्यात मंत्री भोसले यांनी पळस्पे फाटा, पेण, वाशीनाका, गडब, आमटेम, नागोठणे, कोलाड, इंदापूर, माणगाव, लोणारे रोड अशा विविध ठिकाणी सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. स्थानिक नागरिकांशी संवाद साधला व त्यांना येणाऱ्या समस्या जाणून घेतल्या. या समस्या सोडविण्यासाठी सर्वतोपरी सहाय्य करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

महाड येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित आढावा बैठकीत मे महिन्याच्या अखेरपर्यंत मुंबई-गोवा महामार्गाची अपूर्ण कामे प्राधान्याने पूर्ण करावीत, प्रवास करताना नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होणार नाही याची खबरदारी घ्यावी, अशा सूचना मंत्री भोसले यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

या बैठकीला फलोत्पादनमंत्री भरत गोगावले, खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील, भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपीन म्हामुणकर, प्रमोद घोसाळकर, सार्वजनिक बांधकाम मुख्य अभियंता श्री. शेलार, मुख्यव्यवस्थापक अंशुमानी श्रीवास्तव, प्रकल्प संचालक यशवंत घोटकर, अधीक्षक अभियंता (रा.म.), तृप्ती नाग, सा.बा. अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड, कार्यकारी अभियंता श्री. सुखदेवे, नामदे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या वेळी मंत्री भोसले म्हणाले की, महामार्गावर ज्या ठिकाणी पुलांची कामे चालू आहेत त्या ठिकाणी सर्व्हिस रोड नीटनीटके व वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवावेत, जेणेकरून पावसाळ्यापूर्वी व पुढे गणेशोत्सव काळात वाहतूक कोंडी होणार नाही. इंदापूर व माणगाव बायपास पुलाच्या निविदा प्रक्रियेची कार्यवाही फेब्रुवारी महिन्यात पूर्ण होईल व मार्च महिन्यात काम चालू होईल. महामार्गाचे काम करताना ठेकेदाराने केलेल्या कामाचा दर्जा उत्कृष्ट राहील याची विभागाने तपासणी करावी. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या महामार्गाचे काम गतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. संबंधित सर्व यंत्रणांनी दर्जेदार व विहित वेळेत काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत.परस्पर समन्वय साधावा, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

या बैठकीत उड्डाणपूल, सर्विस रोड, गटारे, पावसाळ्यात तुंबणारे पाणी, वाहतूक कोंडी, पथदिवे यासह विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

### 'तोपर्यंत टोल आकारणी नाही'

**महाड** : सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी केली. या पाहणीनंतर त्यांनी महाड येथे अधिकारीवर्गाची बैठक घेतली आणि पत्रकार परिषदेमध्ये पत्रकारांशी संवाद साधला. मुंबई-गोवा महामार्गाचे काम या वर्षीअखेर पूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी या वेळी व्यक्त केला.

पनवेल ते झारापदरम्यान मुंबई-गोवा महामार्गाचे दहा टप्पे असून यापैकी सात टप्प्यांची कामे पूर्ण झाल्या असल्याचे त्यांनी सांगितले. या महामार्गाचे काम जोपर्यंत संपूर्ण पूर्ण होत नाही तोपर्यंत कोणत्याही प्रकारची टोल आकारणी केली जाणार नाही. माणगाव, इंदापूर बायपास या रस्त्याबाबत नव्याने निविदा काढण्यात आल्या असून निविदा प्रक्रियेचे काम फेब्रुवारी अखेरपर्यंत पूर्ण होईल तसेच विविध ठिकाणी असणाऱ्या सर्विस रोडची कामे एप्रिलअखेर मार्गी लागतील, असे ते म्हणाले. पोलादपूर येथील सर्विस रोडचे काम वर्कऑर्डर मिळूनही अद्याप सुरू झाले नसल्याच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले असतात त्यांनी याकडेही त्वरित लक्ष घालून हे काम पूर्ण केले जाईल, असे आश्वासन दिले. किल्ले रायगड प्रवेशद्वार नातेखिंड या ठिकाणी सुशोभीकरण व अंबडवडे येथील प्रवेशद्वार सुशोभीकरण केले जाईल, असे त्यांनी आवर्जून सांगितले. त्याचप्रमाणे महामार्ग व इतर रस्ते यांची कामे वेळेत आणि दर्जेदार होण्यासाठी अर्धवट काम सोडणाऱ्या ठेकेदारांना यापुढे काळ्या यादीत टाकले जाईल व त्यांना कोणत्याही निविदेत सहभागी होता येणार नाही, अशी कारवाई केली जाणार असल्याचे मंत्रीमहोदयांनी स्पष्ट केले.

## कर्जतमध्ये छत्रपती संभाजी महाराज स्मारकाचे लोकार्पण

**कर्जत : प्रतिनिधी**

धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या शौर्याचा इतिहास साक्षी ठेवत नानामास्तर नगरमध्ये उभारलेल्या धर्मवीर संभाजी महाराज यांच्या स्मारकाच्या सुशोभिकरणाचा लोकार्पण सोहळा छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या दिवशी उत्साहात झाला.

नाना मास्तर नगरमधील श्री सिद्धिविनायक मंदिराच्या शेजारी सकरण्यात आलेल्या धर्मवीर संभाजी महाराजांच्या स्मारकाचे ३० लाख रुपये खर्च करून सुशोभीकरण करण्यात आले आहे. या स्मारकाचे लोकार्पण आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी हभप मारुतीमहाराज राणे, माजी उपसभापती मनोहर थोरवे, उद्योजक बाळू तवळे, संजय कडू, सदाशिव बैलमारे, माजी नगरसेवक संकेत भासे, वसंत मोधळे, मारूती बैलमारे, रमाकांत जाधव, नगर परिषद अभियंता मनीष गायकवाड, रामदास बैलमारे, पोलीस पाटील कृष्णा शिंदे आदी उपस्थित होते.

शिवतेज मित्र मंडळाच्या सदस्यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. विजय मांडे यांनी प्रास्ताविकात आमदार महेंद्र थोरवे यांनी मागील पाच वर्षांत भरपूर निधी आणून तालुक्याचा विकास केला. या स्मारकाच्या मागे भिंत उभारून तेथे संभाजी राजांचे चरित्र साकारावे तसेच सध्या या परिसरातील नागरिकांना पाण्याची मोठ्या प्रमाणात समस्या उद्‌भवत आहे. त्यामुळे ५७ कोटी रुपये खर्च करून कर्जत शहरासाठी नवीन पाणी योजना साकारत आहे. या परिसराला पाणीपुरवठा करण्यासाठी येथील उद्यानात पाण्याची टाकी उभारावी, अशी विनंती केली.

आमदार महेंद्र थोरवे यांनी, धर्मवीर श्री संभाजी महाराजांच्या स्मारकाच्या उभारणीसाठी शिवतेज मित्र मंडळाच्या युवकांनी घेतलेल्या पुढाकाराचे आणि त्यांच्या जिद्दीचे कौतुक केले. त्यांच्या अथक परिश्रमामुळेच आज स्मारक प्रत्यक्षात उभे राहू शकले. हे स्मारक संपूर्ण हिंदुस्तानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या दिवशी लोकार्पण होत आहे याचा मला सार्थ अभिमान आहे धर्मवीर संभाजी महाराजांचे बलिदान आणि त्यांची धर्मनिष्ठा तसेच त्यांच्या कर्तृत्वामुळेच आज आपल्या अंगणात तुळशी वृंदावन आहे. युवकांनी आपल्या जीवनाची सुरुवात शिवचरित्र वाचनाने करावी, असा संदेश युवकांना दिला.

या वेळी स्मारक साकारणाऱ्या सचिन व नितीन यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिषेक सुर्वे यांनी केले.



## माणगाव येथील एकतानगर आदिवासीवाडीत शिवणक्लास



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील चारिझेन फाउंडेशनतर्फे एकतानगर आदिवासीवाडी येथे महिलांसाठी शिवणक्लासेस सुरू करण्यात आले आहेत. या क्लासचे उद्घाटन केंद्रप्रमुख शंकर शिंदे, फाउंडेशनचे अध्यक्ष निर्मलसिंग रंधावा आणि राजिपचे माजी सभापती ज्ञानदेव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

चारिझेन फाउंडेशन ही संस्था समाजात सामाजिक बांधिलकी राखून गेल्या अनेक वर्षांपासून काम करीत आहे. अन्न, वस्त्र, शिक्षण, आरोग्य सेवा आधार, गौशाळा, पिण्याचे पाणी, कायदेशीर माहिती, आदिवासी, गरीब, अपंग, वृद्ध, मुले यांच्या विकासासाठी अशा विविध विषयांवर सामाजिक जाणिवेतून फाउंडेशनविविध उपक्रम राबवित आहे. माणगाव तालुक्यात या फाउंडेशनने गोगरीब जनतेचा उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटावा या उद्देशाने गरीब जनतेला तसेच महिलांच्या हाताला काम मिळावे यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. माणगाव एकतानगर आदिवासीवाडी या ठिकाणी फाउंडेशनमार्फत तेथील महिलांकरिता शिलाई मशीनचे प्रशिक्षण सुरू केले आहे.

या महिलांना रुपाली वाघमारे या शिलाई कामाचे प्रशिक्षण देणार असून त्यासाठी लागणाऱ्या मशनरी फाउंडेशनने उपलब्ध करून दिल्या आहेत. दोन महिन्यांचा हा कोर्स आहे.

या कार्यक्रमास फाउंडेशनचे सचिव सतीश काळे, व्यवस्थापकीय संचालक राकेश पडवळ, सभासद किशोर झेमसे, नंदिनी जाधव, विजयश्री कराड आदींसह महिला उपस्थित होत्या.

## वाहन निर्लेखनासंबंधी आवाहन

**अलिबाग** : जिल्हा माहिती कार्यालय, रायगड अलिबाग यांचे अखत्यारित असलेले शासकीय वाहन क्र.एमएच ०४ एएन ३४२७ नादुरुस्त/निकामी वाहन जसे आहे तसे निर्लेखित करण्यात येणार आहे. त्यासाठी इच्छुकांनी आठ दिवसात निविदा पाठवाव्यात, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी रायगड यांनी केले आहे.

हे वाहन पाध्येवाडी, जोगळेकर नाका, अलिबाग या आवारातून खरेदी करावयाच्या शर्ती नुसार विक्री करावयाचे आहे. वाहन विक्रीने घेण्यापूर्वी शनिवार-रविवार व इतर सार्वजनिक शासकीय सुट्टीचे दिवस सोडून कार्यालयीन वेळेत पाहाण्यास उपलब्ध आहे. नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाही. सादर केलेल्या निविदा मंजूर करणे अगर नामंजूर करण्याबाबतचे सर्व अधिकार जिल्हा माहिती अधिकारी रायगड यांचे स्वाधीन राहतील. इच्छुकांनी जिल्हा माहिती कार्यालय, अपर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग, जि.रायगड येथे कार्यालयीन वेळेत जिल्हा माहिती यांच्याशी संपर्क साधून निविदा सादर करावयात.

# बदलती माध्यमं आणि बदलणारी भाषा

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्ली येथे २१, २२ आणि २३ फेब्रुवारी या तीन दिवसांत होत आहे. हे ९८वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आहे. मायमराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आहे. या संमेलन यशस्वी करण्यासाठी अनेक हात मदत करत आहे. शासनही याला पाठबळ देत आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या संमेलनाचे शुक्रवारी शानदार उद्घाटन झाले.

भाषा ही माणसाला मिळालेली सर्वात मोठी देणगी होय. भाषा ही संस्कृतीची वाहक आहे.भाषेशिवाय मानवी अस्तित्व आणि मानवी संस्कृती यांची कल्पनाही करणे अशक्य. मानवी जीवनातील आणि अर्थातच मानवी संस्कृतीतील संचित भाषेच्या माध्यमातूनच एका पिढीतून दुसऱ्या पिढीत संक्रमित झाले आहे.

भाषा कुठून येते? आपण 'मातृभाषा' असा शब्दप्रयोग करतो तेव्हा आईची जी भाषा ती मुलाची भाषा असा अर्थ आपल्याला अभिप्रेत असतो काय? लहान मुल त्याच्या परिसरातील भाषा आत्मसात करते. ते वाढत जाते, तसा त्याच्या परिसराचा विस्तार होतो आणि त्याचा त्याच्या भाषेवर परिणाम होतो. आमच्या छत्रपती संभाजीनगरला (औरंगाबाद) राहणारे लोकं घराबाहेर पडले की अगदी सहज हिंदी बोलतात. आपण ज्या विक्रेत्याकडून भाजी घेत आहोत तो ग्रामीण भागातून आलेला आपल्यासारखाच मराठी माणूस आहे याचा जणू विसरच पडतो आणि 'मेथी क्या भाव है?' असा प्रश्न हाती भाजीची जुडी घेत सहजपणे विचारतो!

प्रश्न भाषेचा असल्याने आणि भाषा ही मूलतः वैयक्तिक असल्याने काही व्यक्तिगत अनुभव नमूद करायला हवेत. साधारण पस्तीस वर्षांपूर्वी पुण्यात राहणाऱ्या मित्राने मला बजावले होते की, पुण्यात रिक्षावाल्याशी हिंदीत बोलायचे नाही! हिंदीत बोलणारा माणूस पुण्यातील नाही म्हणजे नवखा आहे असे रिक्षावाल्यांच्या लगेच लक्षात येते आणि मग त्यातील एखादा जवळच्या अंतरासाठी दूरचा रस्ता जवळ करू शकतो असे त्या मित्राचे सांगणे होते. दुसरा अनुभव दिल्लीतील. तेथे राहणारे माझे एक आप्त मला म्हणाले की त्यांच्या परिचयाच्या अन्य मराठी माणसांच्या तुलनेत माझी हिंदी चांगली आहे. या आप्तांना चांगल्या वाटलेल्या माझ्या हिंदीचे कारण माझे छत्रपती संभाजीनगर येथील वास्तव्य म्हणजे माझा परिसर हे आहे. वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धांसाठी मार्गदर्शन करणारे प्रा. वसंतराव कुंभोजकर विद्यार्थ्यांना सांगत की, मराठी शब्दोच्चारांवर लक्ष द्यायला हवे. हिंदीत 'ण' नाही, पण मराठीत तो आहे आणि त्याचा उच्चार 'न' पेक्षा वेगळा आहे! ही सगळी उदाहरणे भाषेचे परिसराशी असलेले नाते सांगणारी आहेत. कोणतेही व्याकरण शिकण्यापूर्वी भाषा आत्मसात करण्याची मानवी क्षमता नैसर्गिक असल्याचे भाषाशास्त्रज्ञ सांगतात.

अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५

परिसरात माणसं असतात तशी माध्यमं असतात. आज तर माध्यमांचे प्रकार आणि त्यांची संख्या वाढती आहे. ही सारी माध्यमं आपल्या समोर आणून ठेवणारा मोबाईल आपल्या तर नेहमीच हाती असतो. त्याने आपला जणू सारा परिसरच व्यापला आहे. यातील बराच भाग आभासी असतो आणि तो खऱ्याखुऱ्या परिसरापासून आपल्याला नेहमी दूर नेतो, हेही लक्षात घ्यावे लागते. आपला परिसर माध्यमांनी व्यापलेला असल्याने माध्यमांच्या भाषेचा विचार करावा लागतो.

कोणे एकेकाळी (हा कोणे एकेकाळ फार लांबचा नाही!) माध्यमांचे विश्व म्हणजे दैनिके, नियतकालिके, आकाशवाणी आणि दूरदर्शन असे होते. (आकाशवाणी आणि दूरदर्शन हे शब्द रेडिओ आणि टेलिव्हिजन या शब्दांचे मराठी प्रतिशब्द नव्हेत, पण माध्यमांनी त्या अर्थाने ते रूढ केले आहेत. 'झेरॉक्स' हा शब्दही असाच रूढ झाला आहे. मागच्या पिढीत वनस्पती तुपासाठी 'डालडा' हा शब्दही असाच रुढ झाला होता.) जेव्हा माध्यमाचे विश्व मर्यादित होते तेव्हा त्यांच्यातील स्पर्धाही मर्यादित होती. (माणसाची झोप ही आमची प्रतिस्पर्धी आहे, असे म्हणणाऱ्या 'नेटफ्लिक्स' चा काळ तेव्हा कल्पनेतही नव्हता!) एकूण जीवनाला आजच्यासारखी गती नव्हती. 'सर्वात आधी आणि सर्वांच्या पुढे' हा आजचा जीवनमंत्र तेव्हा माध्यमांनी स्वीकारलेला नव्हता. तेव्हा तंत्रज्ञान आजच्या इतके गतिमान नव्हते आणि त्याच्या गतीची मर्यादा स्वीकारली गेली होती. माध्यमे तंत्रज्ञानप्रधान नव्हती. तेथे काम करणारे आणि वाचक ( ग्राहक नव्हे !) माषत्त्वाचे होते.वाचकांची जडणघडण आपण करू शकतो ही भूमिका तेव्हा रूढ होती. म्हणूनच काही दैनिके राशिभविष्य छापत नव्हती. काही दैनिके आसामऐवजी असम, पंतप्रधानऐवजी प्रधानमंत्री, मध्यपूर्वऐवजी पश्चिम आशिया, उत्तरपूर्वऐवजी इशान्य असे शब्द जाणीवपूर्वक उपयोगात आणत. त्या काळातील भाषा ही बहुतेकवेळा प्रमाणभाषेशी नाते सांगणारी होती. मराठी शब्द कटाक्षाने वापरण्याकडे कल होता. आज एका बाजूला कम्प्युटर हा शब्द वापरला जातो आणि त्याच वेळी डेटा या शब्दासाठी विदा हा शब्द रूढ करण्याचा प्रयत्न सुरू असतो आणि यात विसंगती आहे, असे कोणालाही वाटत नाही. हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्ट यांना अनुक्रमे उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय हे रूढ झालेले शब्दही वापरले जात नाहीत. काही वेळा मुख्य न्यायाधीश आणि सरन्यायाधीश असा फरक केला जात नाही. दिनांकऐवजी तारीख, सप्ताहएवेजी आठवडा असे सोपे शब्द रुजवण्यासाठी प्रयत्न झाले याचा आता विसर पडला आहे. हे घडत आहे याची अनेक कारणे आहेत. वर्तमानपत्रांच्या जगात पूर्वी बातमी असो की लेख ते संपादकीय संस्कार केल्यानंतरच पुढे पाठवले जात. वार्ताहर, मुख्य वार्ताहर, उपसंपादक, मुख्य उपसंपादक, वृत्तसंपादक... अशा पायऱ्या तेव्हा केवळ नामाभिधानासाठी अस्तित्वात नव्हत्या तर त्यांची स्वतंत्र कार्ये निर्धारित होती. आज ही पदं अस्तित्वात आहेत. पण त्यांची दैनंदिन कार्ये बदलेली दिसतात. हा बदल तंत्रज्ञानातील बदलासोबत आला. तंत्रज्ञान गती आणि स्पर्धा घेऊन आले. त्याने माध्यमांचे स्वरूप बदलले. मुद्रितशोधक हद्दपार झाला. बातमीदार असो की लेखक, तोच त्याच्या मजकूराचा अनेकदा उपसंपादक ठरू लागला. जी दैनिके वेगळी जिल्हा पाने देतात त्या पानांत या स्थितीचे प्रतिबिंब सहज दिसते. याचा परिणाम भाषेवर झाला. काहींनी नव्या पिढीशी नाते जोडायचे म्हणून त्या पिढीच्या भाषेशी नाते जोडण्याचा व्यावहारिक आग्रह धरला. त्याला कधी तात्विक रूप दिले. त्यातून भाषेचे रूप आणखी पालटले. महानगरातील भाषेत जशी इंग्रजी आणि हिंदीची सरमिसळ झालेली असते तशीच भाषा दैनिकातून डोकावू लागली. महानगरात राहणारी नवी पिढी इंग्रजी माध्यमातून शिकते.त्याच पिढीतील प्रतिनिधी आज वेगवेगळ्या माध्यमातून काम करतात. मग वटहुकूम आणि शासन निर्णय, विधेयक आणि कायदा यात फरक केला जात नाही. मराठीत क्रियापदांचे अनेकवचनी रूप असते. आदरार्थी अनेकवचन उपयोगात आणण्याची पद्धत आहे अशा बाबींचा विसर पडतो.

कोणतीही भाषा स्थिर असू शकत नाही आणि भाषेने अन्य भाषांमधील शब्द स्वीकारण्यास काही प्रतिबंध असू शकत नाही, पण असे शब्द स्वीकारताना आपल्या मूळ भाषेला रजा देण्याची गरज नाही. बँकेला बँक म्हणावे, पण चेक साठी धनादेश हा शब्द सर्वांना समजतो ना?

आपल्या भाषेविषयी मराठी माणूस जागरूक नाही ही विदारक वस्तुस्थिती आहे. मागे नगरला (आजचे अहिल्यानगर) साहित्य संमेलन झाले तेव्हा सुप्रसिद्ध दिग्दर्शक बासू भट्टाचार्य म्हणाले होते की, कोलकाता शहरात सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ राहायचे असेल तर बंगाली भाषा शिकावीच लागते, पण महाराष्ट्रात तशी परिस्थिती नाही. येथे पिढ्यान्‌पिढ्या राहणारी माणसं मराठी नव्हे तर त्यांची मातृभाषा आणि हिंदी/इंग्रजी बोलत राहू शकतात, राहतात. असे म्हणतात की, ही विदारक वस्तुस्थिती ते सांगत होते तेव्हा सभामंडपातील प्रेक्षक टाळ्या वाजवत होते.

आपल्याकडील माध्यमात याच अवस्थेचे प्रतिबिंब पडले आहे. त्यामुळे अनेकदा माध्यमातून कानी पडणारी किंवा वाचनात येणारी मराठी ही अनेकदा मराठी वळणाची राहिलेली दिसत नाही. त्यातून मग 'धन्यवाद 'मानतो'/'मानते ' यासारखे शब्दप्रयोग रूढ होतात. आभार मानले जातात आणि धन्यवाद दिले जातात हे लक्षात घेतले जात नाही.

आपल्याकडे दूरचित्रवाणीचा झपाट्याने विस्तार होत असताना एका मान्यवरांनी असे लिहिले होते की, पाश्चात्य देशात 'मुद्रण संस्कृती' रुजल्यानंतर तेथे टेलिव्हिजन आला.आपल्याकडे मुद्रण संस्कृती रुजण्यापूर्वीच टेलिव्हिजन आला आणि विस्तारत असून त्याचे काही दुष्परिणाम संभवतात. भाषेच्या बाबतीत हे दुष्परिणाम आपण आता अनुभवत आहोत.

इंग्रजी माध्यमातून होणारे शिक्षण, बहुभाषक परिसरात संपर्कासाठी सहजपणे उपयोगात आणली जाणारी हिंदी, माध्यमांना आलेले तंत्रज्ञानप्रधान व्यवसायाचे रूप, उसंत न देणारी वाढती स्पर्धा या आणि अशा काही कारणांमुळे आजच्या माध्यमात दिसणारी भाषा विचित्र रूप धारण करीत आहे. माध्यमांचा समाजमनावर होणारा परिणाम लक्षात घेता माध्यमांकडून उपयोगात आणली जाणारी भाषा महत्वाची ठरते. ती निष्कारण कठीण, बोजड नको तशीच स्वतः चे अस्तित्व सहजपणे विसरणारीही नको. ती पुढे जाणारी, स्वागतशील हवी आणि तिचे नाते तिच्या मुळांशी हवे.


**-राधाकृष्ण मुळी, सेवानिवृत्त संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

# केरळ, विदर्भ ‘रणजी’च्या फायनलमध्ये

## गुजरात, मुंबई संघांचा उपांत्य फेरीत पराभव

**अहमदाबाद, नागपूर : प्रतिनिधी**

रणजी चषक स्पर्धेच्या अंतिम स्पर्धेत कोणते दोन संघ असणार याचे उत्तर मिळाले आहे. अहमदाबाद येथे झालेल्या उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात केरळने गुजरातवर मात केली, तर नागपूर येथे झालेल्या दुसऱ्या सामन्यात गतविजेत्या मुंबईला विदर्भाने पराभूत केले. आता केरळ आणि विदर्भ यांच्यात २६ फेब्रुवारी अंतिम लढत होईल.



तब्बल ७४ वर्षांनंतर केरळने या स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आहे. अहमदाबाद येथे झालेल्या सेमी फायनलच्या लढतीत केरळच्या ४५७ धावांच्या डोंगरासमोर खेळताना गुजरातने चिवटपणे खेळ करत लढा दिला. गुजरात हा धावांचा डोंगर पार करून माफक का होईना आघाडी मिळवणार अशी चिन्हे होती, पण वादग्रस्त अशा निर्णयामुळे गुजरातचा डाव ४५५ धावांवर आटोपला आणि केरळला दोन धावांची आघाडी मिळाली.

गुजरातने प्रियांक पांचाळच्या १४८ धावांच्या खेळीच्या जोरावर ४५५ धावांची मजल मारली. प्रियांकने १८ चौकार आणि एका षटकारासह ही खेळी सजवली. आर्य देसाईने ७३, तर जयमीत पटेलने ७९ धावांची खेळी केली. गुजरात आघाडी मिळवणार असे चित्र असताना आदित्य सरवटेच्या चेंडूवर अर्झान नागवासवालाने खेळलेला चेंडू सिली पॉइंटला क्षेत्ररक्षण करणाऱ्या खेळाडूच्या हेल्मेटला लागून हवेत उडाला. स्लिपमध्ये सचिन बेबीने झेल पूर्ण केला. नागासवालाने केलेला स्लॉग स्वीपचा प्रयत्न सिली पॉइंटला उभ्या असणाऱ्या सलमान निझारच्या हेल्मेटवर आदळला आणि रिबाऊंड होऊन आकाशात उडाला. सचिन बेबीने हा चेंडू टिपला आणि गुजरातचा डाव आटोपला. केरळतर्फे जलाज सक्सेना आणि आदित्य सरवटे यांनी प्रत्येकी चार विकेट्स घेतल्या.

दुसरीकडे विदर्भाने मुंबईचा पराभव करत रणजीच्या अंतिम सामन्यात धडक मारली आहे. विदर्भाने मुंबईकडून गतवर्षीच्या पराभवाचा बदला घेत ८० धावांनी दणदणीत विजय मिळवला आहे. मुंबईला विजयासाठी ४०६ धावांचे लक्ष्य विदर्भने दिले होते, पण मुंबईची फलंदाजी फळी या सामन्यातील दुसऱ्या डावातही अपयशी ठरली.

## राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत बबन झोरेला रौप्यपदक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंजाबमध्ये सुरू असलेल्या राष्ट्रीय क्लासिक पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडचा राष्ट्रीय खेळाडू बबन बाबू झोरे याने रौप्यपदक पटकाविले आहे.



बबनने ५९ किलो वजनी गटामध्ये स्कॉट प्रकारात १८७.५, किलो, बेंचप्रेसमध्ये १२० किलो आणि डेडलिफ्ट प्रकारात २३५ किलो असे एकूण ५४२.५ किलो वजन उचलले आणि रौप्यपदक जिंकले. बबन हा इंडि क्लब कर्जतचा खेळाडू असून त्याला राष्ट्रीय खेळाडू हनुमंत खरात यांचे मार्गदर्शन आणि अरुण पाटकर (पनवेल) यांचे प्रोत्साहन लाभले.

बबनच्या या यशाबद्दल पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष गिरीश वेदक, सचिव अरुण पाटकर, सहसचिव सचिन भालेराव, सदस्य संदीप पाटकर, सुभाष टेंबे आणि कार्याध्यक्ष यशवंत मोकल या सर्वांनी आनंद व्यक्त करून त्याचे अभिनंदन केले.



## जय मल्हार क्रिकेट संघ विजेता

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान शहरात मागील तीन दिवस क्रिकेटचा थरार सुरू होता. बंड्या बॉईज क्रिकेट संघाच्या वतीने स्थानिक ओव्हर आर्म टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन येथील वीर हुतात्मा भाई कोतवाल क्रीडा संकुल या ठिकाणी करण्यात आले होते. या वर्षीच्या ट्रॉफीचा मानकरी जय मल्हार क्रिकेट संघ ठरला.

स्पर्धेचे यंदाचे दहावे वर्ष होते. स्पर्धेत एकूण १० संघांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे मुख्य आकर्षण म्हणजे प्रत्येक संघात दोन आयकॉन खेळाडूंचा समावेश करण्यात आला होता. अंतिम सामना विक्रांत क्रिकेट संघ विरुद्ध जय मल्हार क्रिकेट संघ असा रंगला होता. बलाढ्य विक्रांत संघाला जय मल्हार संघाने सहज पराभूत करून विजेतेपद पटकाविले. विजेत्या संघाला रोख पारितोषिक व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

## आरडीसीएची टी-२० प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने एप्रिल महिन्यात आरडीसीए टी-२० प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी दिली. रायगड जिल्ह्यात टेनिस बॉल क्रिकेटचे सर्वत्र साम्राज्य पसरले असताना लेदर बॉल क्रिकेटला नवसंजीवनी देण्यासाठी आरडीसीए कार्यरत आहे.



पुरुषांच्या या स्पर्धेत जिल्ह्यातील आठ संघाचा समावेश असणार आहे. विविध संघांचे मालक लिलाव पद्धतीच्या माध्यमातून खेळाडू खरेदी करतील. यासाठी जिल्ह्यातील खेळाडूंना चार श्रेणीत आपली नोंदणी ऑनलाइन गुगल फॉर्मद्वारे ५ मार्चपर्यंत करायची आहे. खुला गट, २३ वर्षाखालील, १९ वर्षाखालील व १६ वर्षाखालील गटात खेळाडूंचा समावेश करण्यात येणार आहे.प्रत्येक संघात आयकॉन खेळाडूसह १८ खेळाडू असतील. प्रत्येक क्षेणीतील खेळाडूंना संघात स्थान देण्यात येणार आहे. त्यामध्ये आयकॉन १ खुल्या गटातील जास्तीत जास्त सात, २३ वर्षाखालील गटात चार, १६ वर्षाखालील गटात चार आणि सोळा वर्षाखालील गटात दोन खेळाडू असतील. प्रत्येक संघाला सात लीग मॅचेस खेळण्यास मिळतील.

स्पर्धेसाठी खेळाडूंचा लिलाव मार्च महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात एका रंगारंग कार्यक्रमाद्वारे करण्यात येणार आहे. संपूर्ण स्पर्धा यू ट्यूबच्या माध्यमातून लाइव्ह प्रदर्शित करण्यात येईल. जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी स्पर्धेत सहभागी व्हावे तसेच कॉर्पोरेट, औद्योगिक, व्यावसायिक संस्थांनी पुढे येऊन प्रायोजकत्व देऊन सहकार्य करण्याचे आवाहन आरडीसीए अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे.

## कोकण विभागीय स्पर्धेत जयंत दबडे यांना सुवर्णपदक



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तहसीलदार कार्यालयात सहाय्यक महसूल अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या जयंत शांताराम दबडे यांनी कोकण विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत थाळीफेक या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक पटकाविले. ही स्पर्धा नुकतीच सिंधुदुर्ग येथे झाली.

या यशाबद्दल सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी अनिल पाटील आणि कोकण विभागीय आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी जयंत दबडे यांचा प्रशस्तीपत्र प्रदान करून विशेष गौरव केला.

दबडे यांनी यापूर्वी रायगड जिल्हा महसूल क्रीडा स्पर्धेतही आपली चमक दाखवली होती. अलिबाग येथील आरसीएफ मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत त्यांनी थाळीफेक, गोळाफेक आणि भालाफेक या तीन क्रीडा प्रकारांमध्ये द्वितीय आणि २०० मीटर धावण्याच्या शर्यतीत तृतीय क्रमांक मिळवला होता. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना रायगड जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्या हस्ते रौप्य व कांस्यपदक देऊन गौरविण्यात आले होते.

## राष्ट्रीय बँडी आईस स्केटिंग कॅम्पमध्ये तनय उतेकरचा सहभाग

**माणगाव : प्रतिनिधी**

द्वितीय राष्ट्रीय बँडी आईस स्केटिंग कॅम्प गुलमर्ग जम्मू काश्मीरमधील गुलमर्ग आईस कोर्ट येथे झाला. यामध्ये माणगाव तालुक्यातील तासगाव या छोट्या गावातील होतकरू खेळाडू तनय ज्ञानेश्वर उतेकर याने उणे नऊ अंश सेल्सियस तापमानामध्ये खेळ केला.



या कॅम्पसाठी संपूर्ण देशातून २४५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये प्रामुख्याने जम्मू काश्मीर, तामिळनाडू, हरियाणा, गोवा, गुजरात, दिल्ली, कर्नाटक, कोलकाता, महाराष्ट्र इत्यादी राज्यातील खेळाडू होते. माणगावमधील तनय उतेकरने स्केटिंग कौशल्य दाखवले. याबद्दल गुलमर्ग डेव्हलपमेंट ऑथोरिटीचे प्रमुख तारिक हुसेन, टुरिझम गुलमर्ग असिस्टंट डायरेक्टर ताहीर वाणी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

तनयला गुलमर्ग येथे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक असक्रोफ डिजो, राष्ट्रीय प्रशिक्षक विशाल सोलंकी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

तनय सध्या गणेश यशवंत वाघरे इंग्लिश मीडियम स्कूल माणगाव येथे शिकत असून सराव श्रेयश गमरे अशोकदादा साबळे विद्यालयात घेत आहे. तनय याचे राज्याचे मंत्री भरत गोगावले, माणगाव शिक्षक प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, बँडी असोसिएशन रायगडचे सचिव संजय गमरे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पेण येथे २४ फेब्रुवारीला महिला निवड चाचणी क्रिकेट शिबिर

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)च्या वतीने २४ फेब्रुवारी रोजी पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर महिलांच्या खुल्या गटाचे प्रशिक्षण व निवड चाचणी शिबिराचे आयोजित करण्यात आले आहे.



या शिबिरामध्ये जिल्ह्यातील तज्ञ प्रशिक्षक मार्गदर्शन करणार असून याच शिबिरातून रायगड जिल्ह्याचा महिलांचा संघ निवडला जाणार आहे. निवडण्यात आलेले संघ पुढील आठवड्यात महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आंतरजिल्हा निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत सहभागी होतील.

या निवड चाचणीला कोणतेही प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही. खेळाडूंनी स्वतःचे आवश्यक क्रिकेट साहित्य आणि क्रिकेटच्या पांढऱ्या गणवेशात सकाळी ९ वाजता उपस्थित रहावयाचे आहे. सोबत आपले आधारकार्ड, जन्माचा दाखला, स्वतःचा पासपोर्ट साईज फोटो घेऊन येणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त महिलांनी या शिबिरात सहभाग घेण्याचे आवाहन आरडीसीए महिला क्रिकेटच्या प्रमुख आदिती दळवी व आरडीसीएचे उपाध्यक्ष राजेश पाटील यांनी केले आहे.

## रेवदंड्यातील क्रिकेट स्पर्धेत थळ संघ प्रथम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

ॐ साई मित्र मंडळ थेरोंडा आयोजित टेनिस बॉल मर्यादित षटकांच्या ओव्हरआर्म क्रिकेट स्पर्धेत सागरी गणेश थळ संघाने प्रथम क्रमांक पटकावला.

रेवदंडा येथील हरेश्वर मैदानात स्पर्धा रंगली. स्पर्धेत एकूण ३२ संघानी सहभाग घेतला होता. व्दितीय क्रमांक युनिटी धोकवडे, तृतीय बापदेव बोर्ली, चतुर्थ क्रमांक रोहा रोठ संघाने मिळवला. मालिकावीर करण तोडणकर, अंतिम लढतीतील सामनावीर रोशन, उत्कृष्ट फलदांज हसनेन कुरेशी, उत्कृष्ट गोलदांज कल्पेश म्हात्रे यांची निवड करण्यात येऊन गौरविण्यात आले. बक्षीस वितरण समारंभास आयएसपील स्पर्धेत प्रतिनिधीत्व करणारा आर्यन खारकरचा सत्कार करण्यात आला.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com